११६२

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ला. वा.
दा. क्र. ११६२

B.BK-0401162
BVBK-0401162

११६२



अनंत श्रीविभूषित

अखण्डानंद सरस्वतीजी महाराज

BVBK-0401162

ॐ
ॐ
ॐ
ॐ

# संपादकाचे मनोगत

भारतवर्षातील वंदनीय संत अनन्तश्री विभूषित अखण्डानन्दजी सरस्वती यांच्या सत्संगातून प्रवाहित झालेल्या सुंदर बोधकथा महाराष्ट्रातील आबाल–वृद्धांच्या हाती देताना आम्हाला धन्यता वाटत आहे.

चांगले विचार बालपिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी कथेइतके दुसरे प्रभावी साधन क्वचितच आढळेल. कथा निवेदन करणारा वक्ता जितका प्रभावी असेल त्या प्रमाणात कथा अधिक परिणामकारक होत असतात, हा आपला नेहमीचा अनुभव आहे. या संदर्भात विचार केला असता पू. स्वामीजींसारख्या महापुरुषाच्या विचारमंथनातून निर्माण झालेल्या प्रस्तुत कथा महाराष्ट्रातील भावी पिढ्यांसाठी बहुमोल ठेव ठरतील असा विश्वास आम्हाला वाटतो.

पुस्तकाचे संपादन आणि प्रकाशन करताना बा. वि. मंदिराचे निरलस सेवाभावी कार्यकर्ते सर्वश्री आत्माराम शिंदे, राजाराम पाटकर, बाप्पा कुणकेरकर, अभ्युदय नगरचे आ. शं. सुभेदार, गोरेगावचे श्री. बी. एम. प्रभू, सौ. लीला प्रभू व सौ. कमल देवधर, बोरिवलीचे यशवंत शिंदे, मुलुंडचे शं. दा. बर्डे, नायगाव-वडाळ्याचे वसंतराव शिंदे, मधुकर दिवाडकर व इतर अनेकांचे जे सहकार्य लाभले आहे त्याचे मोजमाप करता येणार नाही.

—यशवंत बळवंत क्षीरसागर

# ॐ परमादरणीय स्वामीजी अनन्तश्रीविभूषित
# ॐ अखण्डानन्द सरस्वतीजी
# ॐ यांचा अल्प-परिचय

श्रीक्षेत्र पंढरपुरात ९ नोव्हेंबर १९७० च्या कार्तिकी एकादशीला एक वेगळेच महत्त्व प्राप्त झाले होते. पंढरीनाथाच्या लडिवाळ भक्ताची-संत नामदेवरायांची ती ७०० वी जयंती होती. चंद्रभागेच्या विस्तीर्ण पावन तीरावर एक भव्य व्यासपीठ उभारण्यात आले होते. महाराष्ट्र राज्याचे सभापति, मंत्री वगैरे वरिष्ठ अधिकारी, पंढरपूरचे नगराध्यक्ष, ह. भ. प. धूंडा महाराज, श्री तनपुरे महाराज वगैरे श्रेष्ठ भगवद्भक्त व्यासपीठावर विराजमान झाले होते. दूर दूर अंतरावरून आलेल्या पंढरीनाथांच्या ६०-७० हजार भक्तांची भव्य उपस्थिती त्या समारंभाला लाभलेली होती. ह्या अद्‌भुत सोहळ्याचे सन्माननीय अतिथी होते अनन्तश्रीविभूषित **स्वामी अखण्डानन्दजी सरस्वती.**

त्या समारंभात सुमारे तासभर झालेले स्वामीजींचे प्रवचन सर्वांनी कमालीच्या तन्मयतेने ऐकले. ज्या महान संतांनी ह्या पुण्यभूमीत भागवत धर्म रुजविला त्या संतांचे हृदय स्वामीजींच्या शब्दाशब्दातून प्रगट होत होते. त्या अक्षय ज्ञानगंगेत अवगाहन करण्याचे भाग्य ज्यांना लाभले ते स्वामीजींना कधीच विसरू शकणार नाहीत!

पू. स्वामीजींचा जन्म २५ जुलै १९११ रोजी उत्तर प्रदेशात वाराणसी जिल्ह्यातील महराई गावी, एका गरीब पण विद्वान ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे लहानपणीचे नाव शांतनु विहारी द्विवेदी. स्वामीजींचे वडील, आजोबा धर्म-शास्त्रातील मोठे पंडित व ज्योतिषी होते.

शांतनु ७ वर्षांचा असताना त्याचे वडील वारले व त्याच्या संगोपनाची जबाबदारी आईवर व आजोबांवर येऊन पडली!

वयाच्या ९-१० वर्षापर्यंत दुर्गापाठ, मुहूर्त-चिन्तामणि, लघुकौमुदी, रघुवंश कंठस्थ झाले. हिंदुधर्मशास्त्रात ज्याला आदराचे उच्चस्थान प्राप्त झाले आहे अशा श्रीमद् भागवत महापुराणाचे पठण शांतनूने वयाच्या १० व्या वर्षी केले होते, ही गोष्ट अपूर्व समजायला हवी. ईश्वरदर्शनाच्या तीव्र इच्छेने वयाच्या १९ व्या वर्षीच स्वामीजी घराबाहेर पडले.

संत-महात्म्यांचा वेळोवेळी लाभलेला सत्संग व कृपाशीर्वाद हा स्वामीजींच्या जीवनातील अमृत-योग होय. 'तू साक्षात ब्रह्म आहेस' असे ठासून सांगणारे महात्मा शंकरानन्दजी महाराज, स्वामीजींकडून २४ लाख गायत्री-जप करवून घेऊन त्यांना भगवान श्रीकृष्णाचे अद्‌भुत दर्शन घडविणारे स्वामी योगानन्दजी महाराज, गंगामैयाच्या कुशीत

बालकाप्रमाणे राहणारे मोकलपूरचे बाबा, डोंगराळ गुहेत समाधी लावणारे मधईपूरचे बाबा यांसारख्या अनेक सिद्ध–महात्म्यांनी स्वामीजींना साधकावस्थेत मोलाचे मार्गदर्शन केलेले आहे.

१९३४ पासून ७–८ वर्षे कल्याण या मासिकाच्या संपादकीय विभागात, स्वामीजींनी विनावेतन काम केले. याच सुमारास **स्वामीजींचा** पूजनीय **श्रीउडिया–बाबाजी महाराज** यांच्याशी जिव्हाळ्याचा संबंध आला. भारतात अन्यत्र जे आढळून आले नाही ते ज्ञानवैराग्याचे दिव्य तेज स्वामीजींना श्रीउडियाबाबांजवळ आढळले. श्रीउडिया-बाबाजी महाराज स्वामीजींना मातेच्या वात्सल्याने सांभाळीत, त्यांच्यावर स्नेहाचा वर्षाव करीत. "आपण जे निष्काम भावनेने काम करतो त्यातही मोह–ममता व कर्मासक्ती निर्माण होऊ शकते"—हा श्रीउडियाबाबाजींनी कथारूपाने मांडलेला विचार (कब्र सच्ची लेकिन मुर्दा झूटा) स्वामीजींना पटला. काही दिवसांनी कल्याण मासिकाच्या परिवाराचा त्याग करून त्यांनी १९४२ साली माघ शु॥ एकादशीला प्रयाग येथे स्वामी ब्रह्मानन्द सरस्वतीजी महाराज यांच्या हस्ते संन्यास–दीक्षा ग्रहण केली. पंडित शांतनु विहारी द्विवेदी या ऐवजी स्वामी अखण्डानन्दजी सरस्वती या नावाने ते आता ओळखू जाऊ लागले.

स्वामीजींची प्रवचने ही एक अपूर्व वस्तू आहे. दिक्–काल–वस्तूच्या पलीकडे झेपावणारी, ईश्वराचे दर्शन घडविणारी त्यांची ज्ञानशक्ती मानवतेविषयीच्या करुणेने ओथंबून जेव्हा मधुर शब्दांचे रूप धारण करते तेव्हा श्रोत्यांना आनंदाची जणू मेजवानी मिळत असते. प्रवचनाचा विषय ज्ञानाचा, भक्तीचा असो की पातंजल योगदर्शन किंवा रामायण–महाभारत असो, आपल्या भावस्पर्शाने कोणत्याही विषयाला दिव्यत्व प्राप्त करून देण्याची किमया स्वामीजींना साधलेली आहे. स्वामीजींचे वक्तृत्व, त्यांची स्मरणशक्ती व विषय प्रतिपादन करण्याची हातोटी सारे काही अद्भुत आहे.

स्वामीजींचे जीवन हे ज्ञान–भक्ति–वैराग्याचे आल्हादकारी रूप आहे. त्यात कोणत्याही प्रकारच्या भेदभावाला किंचितही थारा नाही! ज्ञानी–अज्ञानी, बालक-वृद्ध, गरीब–श्रीमंत, समाजातील विविध पंथांचे विचारांचे लोक–सारेजण सारख्याच अधिकाराने स्वामीजींकडे जातात व उत्साहित होऊन येतात.

गंगाप्रवाहाप्रमाणे पावन व गतिशील असणारे स्वामीजींचे लोकोत्तर जीवन यथार्थपणे शब्दांकित करणे केवळ अशक्य होय.

स्वामीजींचा मंगल आशीर्वाद महाराष्ट्राला अखंडपणे मिळावा व त्यांच्या कृपेने आमची जीवने अधिकाधिक पवित्र व ईश्वरोन्मुख व्हावीत हीच प्रार्थना प्रस्तुत अल्पपरिचयाच्या निमित्ताने आम्ही करीत आहोत.

卐 卐 卐

# १ ॐ ॐ ॐ ॐ मित्रांसाठी स्वतः शिक्षा भोगणारा आर्तत्राण

परमादरणीय श्रीउडियाबाबाजी महाराजांची जन्म-शताब्दी नुकतीच साजरी झाली. जन्मजन्मांतराच्या पुण्याईने, प्रारब्धाने अथवा ईश्वराच्या थोर कृपेने श्रीउडियाबाबाजींचा घनिष्ठ सहवास-सत्संग मला लाभला. उभ्या भारतात जे मिळू शकले नाही, ते अपूर्व वेदांतदर्शन त्यांच्या सहवासात मला लाभले. परंतु ते केवळ मोक्षमार्गाचे आचार्य नव्हते, त्यांच्या निव्वळ दर्शनाने लोकमानसात भक्तीच्या प्रेरणा निर्माण होत, समस्यांचे निराकरण होई.

श्रीउडियाबाबाजी स्वभावाने इतके दयाळू होते की दुसऱ्याला झालेले दुःख त्यांना पाहवत नसे. एकदा वृन्दावनमधील एका सद्गृहस्थाचे फार मोठे नुकसान झाले. आणि त्यावेळी त्याला होणाऱ्या प्रचंड दुःखाच्या केवळ कल्पनेने महाराजजी बेहोष होऊन गेले! महात्माजींच्या निधनाची बातमी रेडियोवर ऐकल्यावर त्यांच्या नेत्रातून अश्रूधारा वाहू लागल्या होत्या!

श्रीउडियाबाबाजींचे लहानपणीचे नाव आर्तत्राण. दुसऱ्याचे दुःख स्वतः भोगण्यात त्यांना लहानपणापासून मोठा आनंद मिळायचा!

आर्तत्राण लहानपणी घरातून निघून एका पंडितजींकडे संस्कृतचे अध्ययन करीत असतेवेळी घडलेला हा प्रसंग आहे---

पंडितजींना पूजेसाठी फुले, बेलपत्रे, तुळशीपत्रे लागत. एकदा आर्तत्राण व त्याचे मित्र फुलांच्या शोधात असताना एका बागेत चोरून शिरले व फुले, पाने तोडू लागले. तितक्यात त्या माळ्याला कुठून तरी चाहूल लागली व तो काठी घेऊन मुलांकडे धावला.

इतर मुले पळून गेली, पण छोटा आर्तत्राण मात्र जागच्या जागी शांतपणे उभा राहिला. माळ्याने धावत येऊन त्याची बकोटी धरली. "बोल, तू फुलं तोडली की नाहीस?"

आर्तत्राणाने आपण फुले तोडल्याचे कबूल केले. इतर मुले तर पळून गेली होती, तेव्हा साहजिकच इतर मुलांना मिळणारा मार व दम एकट्या आर्तत्राणाला सहन करावा लागला!

छोट्या आर्तत्राणाने सारे काही शांतपणे व धैर्याने सहन केले. त्याने आपल्या मित्रांची नावे सांगितली नाहीत की आपल्या गुरुजींचेही नाव सांगितले नाही. 'मला मारहाण झाली तरी हरकत नाही, पण माझे मित्र तरी ह्या मारातून बचावले' हाच आनंद त्याच्या चेहऱ्यावर विलसत होता.

मुलाचे पाय पाळण्यात दिसतात, ह्या न्यायाने श्रीउडियाबाबाजींच्या परोपकारी व करुणामय जीवनाचा हा श्रीगणेशा होय. स्वतःला कितीही कष्ट पडले तरी चालतील, पण दुसऱ्याला कष्ट पडू नयेत, याचे ते सतत स्मरण ठेवीत.

एखाद्या घरी भिक्षेला गेले असले तर भाकरी तयार होईपर्यंत घरात रडणाऱ्या मुलाला मांडीवर घेऊन खेळवायला अगर कधी कुणाचा मसाला कुटून द्यायला त्यांना कमीपणा वाटत नसे!

काही लोकांना वाटेल, "वेळोवेळी अश्रू गाळणारा हा कसला ब्रह्मज्ञानी?"

—तर मी म्हणेन, की "अश्रू ओघळल्यावर जे संपुष्टात येते ते ब्रह्मज्ञान तरी काय कामाचे?"

卐 卐 卐

# २ ॐ ॐ ॐ ॐ प्रभु रामचंद्राला जांभई आली तर—

[मातृपितृभक्त, सत्यवचनी, प्रजाहितदक्ष अशा प्रभु रामचंद्राची मूर्ती भारतीय जीवनात अजरामर झाली आहे. प्रभु रामचंद्राचा एकनिष्ठ सेवक म्हणून महाप्रतापी हनुमंताचे नाव चिरंजीव ठरले आहे. हनुमंताच्या अलौकिक रामभक्तीची ही गंमतीदार कथा—]

वीर हनुमान हा रामरायांचा अनन्य सेवक. तो त्यांना कधी क्षणभरही विसंबत नसे. अयोध्येला परत आल्यावरही तो त्यांची जीवाभावाने सेवा करी. रामाचे कोणतेही काम असो. हनुमान ते काम चटकन करून टाकी!


हनुमंताच्या ह्या स्वभावामुळे सीतामाईची, लक्ष्मणाची व इतर राम-भक्तांची मोठी पंचाईत झाली! त्यांना रामाची सेवा करण्याची संधीच मिळेना! शेवटी या भक्तांनी हनुमंताला वगळून एक गुप्त बैठक घेतली व त्यात सकाळी उठल्या-

पासून तो रात्रीपर्यंत रामरायाची कोण-कोणती कामे असतात, याची भली मोठी यादी केली. ती सर्व कामे त्यांनी आपापसात वाटून घेतली. मोठ्या कटाक्षाने हनुमंताला त्यांनी काही कामच ठेवले नाही!

दुसऱ्या दिवशी सकाळी दरबारात स्वतः सीतामाईने कामांची विभागणी करणारा तक्ता श्रीरामासमक्ष, हनुमंताच्या हाती दिला. हनुमंताला तो तक्ता पाहून आनंद झाला. तो म्हणाला, "वा, फार छान. पण यातून रामरायाच जर कोणतं काम शिल्लक असेल, तर ते मी करीन बरं का?" पुन्हा सर्वांनी ती यादी बारकाईने नजरेखालून घातली व शेवटी हनुमंताची अट मान्य केली गेली.

"ह्या यादीत रामरायाची एक सेवा विसरून राहिली आहे." यादी पुन्हा पाहात हनुमान म्हणाला, "एखाद्या राजाला जर जांभई आली तर लगेच त्याला तोंडासमोर चुटकी वाजवायला कोणी तरी हवं. रामरायाला जर कधी जांभई आली तर चुटकी वाजविण्याची सेवा माझी!"

झाले, लगेच चुटकी वाजविण्यासाठी पवित्रा घेऊन, रामाच्या चेहऱ्यासमोर दोन बोटे धरून, हनुमान उभा राहिला!



तासामागून तास गेले, दरबार भरला-संपला, तरी हनुमान चुटकी वाजविण्याच्या पवित्र्यात उभा ! रामरायाला कधी जांभई येईल कुणी सांगावे ?

सायंकाळी प्रभु रामचंद्र सीतामाईबरोबर उपवनात हिंडायला गेले. तिथेही पवित्रा घेऊन रामासमोर हनुमंताची स्वारी चाललेली ! सारे लक्ष रामाच्या मुखकमलाकडे लागलेले. रात्र होत आली तरी हनुमान रामासमोरून हलेना. रामचंद्राची निजायची तयारी झाली तरी समोर हनुमान उभा ! न जाणो, झोपेत जांभई आली तर ? हनुमंताच्या चेहऱ्यावरील उत्साह अगदी कायम होता.

—शेवटी व्हायचे ते झाले. सीतामाई हरली, सारे रामभक्त हरले. त्यांनी हनुमंताला सांगितले, "तुझ्या तोडीचा रामरायाचा भक्त कुठे आढळणार नाही. नेहमीप्रमाणे रामरायाची कामं तूच करीत जा. आम्ही काही म्हणणार नाही."

आपल्या भक्ताची ही भक्ती पाहून प्रभु रामचंद्राच्या चेहऱ्यावर हास्य फुलले.

卐 卐 卐

## ३ ॐ ॐ ॐ ॐ त्रिलक्षण पहारेकरी

श्रीकाशीक्षेत्र हे भारतीय संस्कृतीचे जणू हृदय आहे. गंगामातेच्या स्पर्शाने पावन झालेल्या ह्या नगरीभोवती असंख्य कथा–प्रसंग गुंफले गेले आहेत.

श्रीरामचरित मानस या अमर काव्याचे जनक, थोर रामभक्त **संत तुलसीदासजी** त्यावेळी काशीतील अस्सी घाटावर, एका लहानशा झोपडीत राहात होते. संतांना जास्त जागेची किंवा वस्तूंची गरज नसते. ईश्वराशिवाय या जगातील इतर कोणतीच वस्तू त्यांना आवडत नाही. अभ्यागतांच्या स्वागतासाठी घोंगडी, दोनचार साधी भांडी, मोजके कपडे, काही पोथ्या— हेच त्यांचे वैभव होते.

तुलसीदासांच्या झोपडीचे दार नेहमी उघडे असे. कुणीही केव्हाही आत यावे ! आत जाणारे चिंता, दुःख घेऊन जात पण बाहेर पडताना मात्र त्यांचे चेहरे संतसमागमामुळे प्रफुल्लित झालेले दिसत.

काशीतील एका चोराच्या लक्षात ही गोष्ट आली. चोरी करायला तुलसीदासांच्या घरापेक्षा अधिक चांगले कोणते घर सापडणार? त्याच रात्री आपला बेत तडीला न्यायचे त्याने ठरविले. मध्यरात्र उलटल्यावर पावले न वाजवता तो तुलसीदासजींच्या झोपडीकडे वळला. नेहमीच्या उघड्या दरवाजातून तो आत शिरणार, तोच त्याच्या उजव्या दंडाला काही तीक्ष्ण वस्तू टोचल्यासारखी वाटली. त्याने दचकून पाहिले, तो काय?

एक श्यामवर्ण तेजस्वी धनुर्धारी हातात धनुष्य सज्ज करून काळोखात उभा होता. तो चोर भीतीने जरा डाव्या बाजूला सरकला, तर तिथेही दुसरा तरुण धनुष्यबाण सज्ज करून उभा! हा दुसरा तरुण मात्र जरा गोरा होता एवढाच फरक, नाही तर दोघांचे वय जवळजवळ सारखेच दिसले. एकमेकांशी ते डोळ्यांनी बोलताहेत असाही भास त्या चोराला झाला. चोर बिचारा जो पळाला, तो दूर धापा टाकीत उभा राहिला!

मुद्दाम चार दिवस जाऊ दिल्यावर चोराने तुलसीदासजींच्या घरात शिरण्याचा पुन्हा प्रयत्न केला. पण ते दोन्ही पहारेकरी अगदी तसेच धनुष्यबाण घेऊन उभे! चोराने चोरी करायच्या वेळा बदलल्या, युक्त्या बदलल्या, पण पहारेकरी आपले कायम!

का कोणास ठाऊक, पण त्या पवित्र पहारेकऱ्यांच्या दर्शनाने चोराचे जीवन निर्मळ होत चालले. एक दिवस मन घट्ट करून तो दिवसा तुलसीदासजींच्या झोपडीत शिरला व त्यांच्या पायावर मस्तक ठेवून आपली असफल झालेली चौर्यकथा त्याने त्यांना ऐकवली व त्या विलोभनीय कर्तव्यतत्पर पहारेकऱ्यांचे पुन्हा एकदा दर्शन व्हावे अशी त्याने सद्गदित होऊन प्रार्थना केली.

संत तुलसीदासजी एकाएकी गंभीर झाले. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. "माझ्यासारख्या सामान्य माणसासाठी प्रभु रामचंद्रांना व श्रीलक्ष्मणजींना रात्रभर पहारा करावा लागला ना? अरेरे! कुठून दुर्बुद्धी झाली आणि घरात चार वस्तू ठेवल्या!"

तुलसीदासजींनी लागोलग घरातील सगळ्या वस्तू गरिबांना वाटून टाकल्या. भारावलेल्या मनाने ते प्रभु रामचंद्राचे भजन करू लागले.

卐 卐 卐

# ४ ॐ ॐ चौथा इसम ॐ ॐ साक्षात नारायण!

दक्षिण भारतातील एक आल्वार संत पर्वताच्या कडेला असलेल्या आपल्या छोट्याशा कुटीत भगवंताचे भजन करीत आनंदात पहुडले होते. जेमतेम एका माणसाला आडवे होण्यास पुरेल इतकी लहान ती कुटी होती. पावसाळ्याचे दिवस. एकाएकी प्रचंड वादळ सुरू झाले. विजा कडाडू लागल्या. त्या उदार संताच्या मनात आले—"ह्या वादळात माझ्या ह्या छोट्या कुटीत कोणाला आसरा देता आला तर? काही हरकत नाही, मी एकटा असा रेलून भजन करीत आहे. कुणी आलं तर आम्ही दोघे बसून भजन करू."

आश्चर्य असे, की याच सुमारास कुटीचे दार ठोठावले गेले. एक साधू आत आला आणि दोघेही कुटीत बसून भजन करू लागले. त्या दोघांच्या मनात विचार आला, "ह्या वादळात आणखी कुणी तिसरे कुटीत आले, तर आपण बसण्याऐवजी उभ्याने भजन करू बरं." आणि योगायोगाने लगेच तिसरा इसम तेथे येऊन तिघांचे उभे राहून भजन सुरू झाले!

बाहेर वादळ घोंघावतच होते. त्या तिघांच्याही मनात विचार आला— "आणखी चौथा इसम इथे आसऱ्याला आला तरी काय हरकत आहे? जरा दाटीवाटीने उभं राहून भजन करावं लागेल इतकंच!"

ह्या विचार त्या तिघांच्या मनात येण्याचा अवकाश, पुन्हा दरवाजा उघडला गेला आणि ओलाचिंब झालेल्या चौथ्या एका इसमाने प्रवेश केला! दाटीवाटीने उभे राहून भजन पुन्हा सुरू झाले.

पण काय आश्चर्य! या चौथ्या इसमाच्या स्पर्शाने तिघांच्या शरीरावर रोमांच उभे राहिले, हृदये भक्तिभावाने भरून गेली. त्या अपुऱ्या कोंदट झोपडीत दिव्य प्रकाश झळकू लागला. मंद–सुगंधित वायू वाहू लागला. हा चमत्कार झाला तरी कसा, म्हणून तिघेजण त्या नवीन इसमाकडे डोळे विस्फारून पाहू लागले—

ज्याच्या दर्शनाकरिता भक्त जीवनभर तळमळतात तो साक्षात चतुर्भुज नारायण तिथे उभा होता!

卐 卐 卐

# ५ ॐ ॐ ॐ ॐ विदेही जनकराजांची तन्मयता

मिथिलेच्या जनक राजाचे नाव तुम्हाला परिचित असेल. केवळ कर्तव्यदक्ष राजा म्हणून नव्हे, तर महान आत्मज्ञानी म्हणून त्यांची ख्याती होती. मोठमोठे ऋषि-महात्मे त्यांचा आदर करीत, त्यांच्या ज्ञानाला अभिवादन करीत.

मिथिला नगरीत घडलेला हा प्रसंग आहे. एकदा महर्षी याज्ञवल्क्यांची प्रवचने तिथे चालली होती. जनक महाराज आदरपूर्वक त्या प्रवचनांना उपस्थित राहात. सत्संग, ईश्वरासंबंधीची कथा-प्रवचने ही जीवन सुधारण्याची, ईश्वराभिमुख करण्याची महान साधने आहेत. प्रवचनांतील वक्ते याज्ञवल्क्य मुनीही जनकराजांचा आदर करीत. ते प्रवचनाला येईपर्यंत प्रवचन सुरू करीत नसत!

नेमकी हीच गोष्ट त्या प्रवचनासाठी येणाऱ्या काही साधु-संन्याशांना खटकली! जनकराजांची योग्यता त्यांना अजून कळली नव्हती. "घरादाराचा, वैभवाचा त्याग करून आलेले आम्ही एवढे मोठे संन्यासी, आम्ही इथे हजर राहूनसुद्धा याज्ञवल्क्य कथा का सुरू करीत नाहीत? ह्या गृहस्थाश्रमी जनकराजाची वाट कशाला पाहायला हवी?" ते साधु-संन्यासी कुरकूर करू लागले व ही कुरकूर याज्ञवल्क्यांच्या कानी जाऊन पोहोचली सुद्धा!

एक दिवस अशीच कथा चालली होती. वक्ते याज्ञवल्क्य, जनक राजा व इतर सर्व श्रोते ईश्वरी आनंदात तन्मय झाले होते. पृथ्वीवर जणू स्वर्ग अवतरला होता.... अशा वेळी एक राजदूत अगदी धावत-पळत, धापा टाकीत तेथे आला. जनक राजांसमोर हात जोडून म्हणाला—"महाराज, क्षमा करा, नगरीत मोठा आगीचा डोंब उसळला आहे. लोक सैरावैरा धावत आहेत, सारा कोलाहल माजला आहे."

आपले मन कथामृतातून अगदी प्रयासाने बाजूला काढून जनकराजांनी सेवकाचे ते बोलणे ऐकले. ते त्याला म्हणाले, "माझे नेमलेले अधिकारी नगररक्षणाची सर्व व्यवस्था ठीक करतील. ही कथा टाकून येण्याची माझी मुळीच आवश्यकता नाही." पुन्हा कथा-श्रवणात जनक राजे तन्मय होऊन गेले.

आठ—दहा मिनिटे गेली असतील. तो राजदूत पुन्हा धावत आला आणि केविलवाण्या स्वरात सांगू लागला, "महाराज, मोठा घात झाला आहे. ही

भयंकर आग आपल्या राजवाड्यापर्यंत पोहोचली आहे. अंतःपूर जळू लागलं आहे"—तरीही जनक राजे शांत होते. कथामृतात तल्लीन झालेल्या त्यांच्या मनाला चिंता, भय, उद्वेग हे विकार स्पर्श करू शकत नव्हते! सारेजण विस्मित होऊन पाहात होते.

पुन्हा तिसऱ्यांदा तो सेवक भयाकुल होऊन आला. "महाराज, आपला राजवाडा तर जळून चालला आहे; एवढंच नव्हे तर, ह्या प्रवचनाच्या जागेपर्यंत ती आग येऊन पोहोचली आहे! ही कथा ऐकणारे साधु–संन्यासी जिथे उतरले आहेत त्या कोठ्या आगीत सापडल्या आहेत! या महात्म्यांच्या छाटया, त्यांचे कमंडलू, त्यांची पूजेची आसने व इतर सामुग्री जळून भस्मसात व्हायची वेळ आली आहे.—"

हे शब्द कानावर पडायचा अवकाश! जनकराजावर टीका करणारे ते साधु-संन्यासी त्या प्रवचनातून ताडकन उठले व आपल्या छाट्या–कमंडलू आगीतून वाचविण्यासाठी जीव घेऊन पळत सुटले! जनक राजाचे त्यांच्याकडे लक्षही नव्हते. ईश्वरकथाश्रवणात ते स्वतःला विसरून गेले होते.

हे पळालेले साधुसंन्यासी आपल्या कोठ्यात जाऊन पाहतात तो काय? ती मायावी आग केव्हाच लुप्त झाली होती. त्यांच्या वस्तू किंवा मिथिलेमधील कोणताही भाग आगीत सापडला नव्हता! जनक राजांची ईश्वरपरायणता, त्यांचे निर्लेप अंतःकरण व असंगवृत्ती जगाला जाहीर करण्यासाठी ईश्वराने रचलेली ती माया होती.

卐 卐 卐

## ६ ॐ ॐ ॐ ॐ "तुमची आज्ञा हा माझा स्वर्ग आहे—"

आषाढ महिन्यात गुरुपौर्णिमा अनेक ठिकाणी साजरी होत असते. ज्ञानदानाने आपल्या जीवनाला खरा अर्थ प्राप्त करून देणाऱ्या गुरुजनांविषयी आदर प्रगट करण्याचा हा दिवस. श्रीमद्भागवत व इतर पुराणे, त्याचप्रमाणे महाभारत रचून ईश्वरविषयक ज्ञानाचा व भक्तीचा सर्वत्र प्रसार करणारे भगवान

व्यास–यांचे स्मरण या दिवशी केले जाते. गुरुपौर्णिमेला 'व्यासपौर्णिमा' असेही म्हणतात. भारतीय परंपरेत गुरु–शिष्यांच्या मधुर कथा ठिकठिकाणी आढळतात. त्यांपैकी ही एक कथा आहे–

शीख धर्माचे गुरुदेव नानक यांनी एकदा आपल्या मुलाला आणि एका शिष्याला हाक मारली, व आश्रमाच्या परिसरात ठराविक जागेवर संध्याकाळ-पर्यंत एक चबुतरा (चौथरा) बांधण्याची त्यांना आज्ञा केली.

नानकांचा मुलगा व तो शिष्य दोघेही सूर्योदयापासून अविश्रांत खपू लागले. संध्याकाळपर्यंत एक सुंदर चबुतरा त्या ठिकाणी उभा राहिला. सायंकाळी गुरुदेव नानक जेव्हा तो चबुतरा पाहायला आले तेव्हा तो मुलगा व शिष्य शेजारी हात जोडून उभे होते.

नानकांनी तो चबुतरा पाहिला. "ठीक आहे, पण हे पहा, हा चबुतरा लगेच उध्वस्त करा व उद्या सकाळी याच जागेवर पुन्हा चबुतरा बांधायला लागा." नानकांनी आज्ञा केली.

चबुतरा लगेच उध्वस्त केला गेला आणि दुसऱ्या दिवशी त्या दोघांनी त्याच ठिकाणी पुन्हा बांधकाम सुरू केले!

दुसऱ्या दिवशी सायंकाळी पुन्हा तोच प्रकार! असे ७–८ दिवस गेले. दररोज सकाळी ते दोघेजण चबुतरा बांधण्यास सुरुवात करीत, संध्याकाळी नानक चबुतरा उध्वस्त करायला सांगत व पुन्हा बांधकाम सुरू करावे लागे!

एके सायंकाळी गुरुदेव चबुतरा तोडण्याची आज्ञा करणार तोच त्यांच्या मुलाने काहीसे चिडून म्हटले, "पिताजी, क्षमा करा, गेले आठ दिवस रोज आम्ही हा चबुतरा बांधीत आहोत. हा जर रोज तोडायचा असेल तर आम्हाला बांधायला तरी का सांगता? याचा उपयोग तरी काय? मी नाही उद्यापासून चबुतरा बांधणार!"

गुरुदेव नानकांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. त्यांनी प्रश्नार्थक मुद्रेने शेजारी उभा असलेल्या आपल्या शिष्याकडे पाहिले. शिष्य गुरुदेवांना नम्रतापूर्वक अभिवादन करून म्हणाला,

"महाराज, तुमची आज्ञा पाळणं एवढंच माझं कर्तव्य आहे, असं मी मानतो. या चबुतऱ्याशी माझा संबंध नाही! जन्मभर जरी मला तुम्ही हे चबुतरा

बांधण्याचं व पाडण्याचं काम सांगितलंत, तरी ते मी आनंदाने करीन. तुमची आज्ञा हा माझा स्वर्ग आहे व आज्ञा–पालन हाच माझा परमधर्म आहे.”

शिष्याने आपली नजर हलकेच वर केली, तेव्हा गुरुदेवांच्या दृष्टीत वात्सल्याचे सप्तसागर उचंबळत असल्याचा त्याला भास झाला.

卐 卐 卐

## ७ ॐ ॐ ॐ ॐ कपड्यांनाही प्रतिष्ठा असते—

ईश्वर जगात सर्वत्र भरलेला आहे. अगदी साध्या वस्तू, साधे प्रसंग, जीवनात महान शक्ती निर्माण करू शकतात. अंगावरील कपड्यांतही केवढी शक्ती दडलेली असते—

एक होता राजा. त्याच्या दरबारात कवी, चित्रकार इत्यादि विविध कलावंत होते. आपल्या अंगांतील गुणांनी ते राजाची सेवा करीत. त्या दरबारात एक बहुरूपी पण होता. बहुरूपी राजासमोर निरनिराळी रूपे घेऊन येई. कधी मदारी, तर कधी भिकारी, कधी कुडबुड्या ज्योतिषी, तर कधी ऐटबाज सरदार–अशी निरनिराळी सोंगे तो आणी. राजा त्याला सहज ओळखी व चांगले इनाम देई.

एके दिवशी राजाने त्या बहुरूप्याला भर दरबारात जवळ बोलाविले आणि सांगितले, “मित्रा, तू कुठलाही वेष घेऊन आलास तरी मी तुला ओळखतो. यात तुझी बहादुरी ती काय? आता यापुढे असा वेष घेऊन ये की मला ओळखताच येऊ नये! असा वेष घेऊन आल्यास तुला ५०० मोहोरा इनाम!” बहुरूपी हसला. त्याने राजाला लवून नमस्कार केला व साऱ्यांचा निरोप घेऊन तो राजवाड्याबाहेर पडला.

या गोष्टीला २–३ महिने लोटले. बहुरूपी कुठे दिसेना! राजाने चौकशी केल्यावर कळले, की आपली पत्नी, मुले घेऊन तो राज्यातून निघून गेला आहे. राजाला वाईट वाटले. “आपल्या शब्दांनी तो दुखावला तर नसेल?” असे त्याच्या मनात आले. आणखी ४–६ महिने लोटले, सारेजण त्या गरीब बहुरूप्याला पार विसरूनच गेले

एके दिवशी आपल्या राज्याच्या सीमेवर कोणी एक तेजस्वी संन्यासी महाराज उतरले असल्याची बातमी राजाच्या कानावर उडत उडत आली. शेकडो प्रजाजन त्यांच्या दर्शनाला जात; लोक त्यांच्यासमोर पैसे, खाद्यपदार्थ ठेवीत. पण ते संन्यासी त्या वस्तूंना स्पर्शही करीत नसत. राजाने आपले खास दूत पाठवून त्यांना राजदरबारी बोलावले, पण त्यांनी ते निमंत्रण झिडकारले !

शेवटी एके सकाळी राजाची स्वारी स्वत: होऊन त्या संन्यासी महाराजांच्या दर्शनास निघाली. मोठा लवाजमा, दहा हजार मोहोरांनी भरलेली रत्नखचित तबके घेऊन राजा निघाला.

सुमारे तासभर तिष्ठत राहिल्यावर राजाला गुंफेत प्रवेश दिला गेला ! संन्यासी महाराज ध्यानस्थ बसले होते. अंगात भगवी कफनी होती. कपाळावर भस्माचे पट्टे, गळ्यात रुद्राक्षमाळा होत्या.

राजाने भक्तिभावाने प्रणाम करून, दहा हजार मोहोरांची भरलेली तबके संन्यासी महाराजांसमोर ठेवली. "महाराज, मला आज्ञा करा—" राजाने नम्रपणाने सांगितले.

"आज्ञा एकच आहे—ही तबके तावडतोब परत ने," संन्यासी महाराज म्हणाले. हिरमुसल्या चेहऱ्याने राजाने सर्व मोहरा राजवाड्यात परत आणल्या !

संध्याकाळी कुणी एक व्यक्ती राजाला भेटायला आली. तिला राजासमोर नेण्यात आले. राजाने तिला चटकन ओळखले—"अरे तू बहुरूपी. इतके दिवस होतास तरी कुठे ?"

"सकाळीच आपण माझ्या भेटीला येऊन गेलात पण मला ओळखलंत नाही, महाराज !" बहुरूपी नम्रपणे म्हणाला. "मी ठरल्याप्रमाणे इनामाच्या ५०० मोहोरा न्यायला आलो महाराज !"

राजाला आश्चर्याने वेड लागायची पाळी आली. "अरे, सकाळी मी तुला दिलेल्या दहा हजार मोहरा परत पाठविल्यास आणि आता पाचशे मोहोरा मागतोस ?" राजाने विचारले.

"सकाळी माझ्या अंगावर संन्याशाची भगवी वस्त्रं होती महाराज ! भगव्या कपड्यात असताना त्या मोहोरा कशा घेणार ? अंगावरील कपड्यांनाही काही प्रतिष्ठा असतेच ना ?"

卐 卐 卐

## ८ ॐ ॐ ॐ ॐ खास राखून ठेवलेला 'कटोरा–डाव'

उत्तर हिंदुस्थानातील ही कथा आहे. एका गावात एक नामांकित पहेलवान राहात होता. आता वृद्ध झाल्यामुळे त्याचे केस पांढरे शुभ्र झाले होते. पण चेहऱ्यावरील तेज व शरीरातील उत्साह अजून कायम होता. लोक त्याला आदराने उस्तादजी म्हणत. ते कुठे दिसले की प्रणाम करीत.

उस्तादजींनी आपल्या तालमीत शेकडो शिष्यांना कुस्त्यांचे निरनिराळे डाव शिकवून तरबेज केले होते. त्यांचे काही पहेलवान शिष्य गावोगाव, शहरा–शहरांतून हिंडत व मोठमोठ्या कुस्त्या जिंकून आपल्या गुरुजींच्या कीर्तीत भर घालीत. आपल्या ह्या छोट्या पहेलवानांचे यश पाहून उस्तादजींना खूप खूप आनंद होई, शिष्यांच्या विजयामुळे गुरुजींची कीर्ती अधिक उज्वल होई.

या सर्व शिष्यांत एकजण फारच प्रतापी होता. त्याने शेकडो अजिंक्य–पत्रे मिळविली होती. त्याच्यासमोर कुस्ती खेळायला कुणी धजावत नसे! या प्रतापी शिष्याच्या मनात एक शल्य सारखे टोचत होते. आपल्या विजयामुळे गुरुजींची कीर्ती वाढावी ही गोष्ट त्याला खपत नव्हती! आपले यश निष्कलंक करण्यासाठी उस्तादजींना कुस्तीत हरवलेच पाहिजे, असे त्याच्या मनाने घेतले!

एके दिवशी त्याने राजाची भेट घेऊन उस्तादजींबरोबर कुस्ती खेळण्याचा आपला मनोदय त्याच्या कानावर घातला! या दुर्विचारापासून त्याला परावृत्त करण्याचे अनेकांनी प्रयत्न केले पण कुणाचेही काही ऐकण्याच्या मनःस्थितीत तो शिष्य नव्हता.

अखेरीस तो अंतिम दिवस उजाडला. सारे मैदान माणसांनी फुलून गेले होते. स्वतः राजा आपल्या दरबाऱ्यांसह कुस्ती पाहायला आला होता. छोटा पहेलवान दंड थोपटीत कुस्तीच्या रिंगणात घुमत होता, आपल्या उस्तादजींची वाट पाहात होता.

कुस्तीची वेळ झाली. राजाने एका सेवकाला बोलाविले व उस्तादजींच्या घरी जाऊन त्यांना घेऊन येण्याची आज्ञा केली.

सेवक जेव्हा उस्तादजींच्या घरी गेला तेव्हा ते आपल्या झोपडीच्यासमोर आपला कटोरा (खाण्याचा वाडगा) घाशीत बसले होते. त्यांनी राजाला उलट निरोप दिला,

"महाराजांना म्हणावं, 'माझी कटोरा डावाची उजळणी चालली आहे.' हा अभ्यास पुरा झाला की १५–२० मिनिटांत मी आलोच."

सेवकाने उस्तादजींचा हा निरोप सर्वांसमक्ष राजाला सांगितला.

कटोरा डावाचे नाव ऐकून त्या पहेलवान शिष्याच्या मनात धडकी भरली! उस्तादजींकडून हा शिष्य शेकडो डाव व शेकडो पेच शिकलेला होता, पण "**कटोरा डाव**" काय आहे, याचा त्याला काहीच बोध होईना! "या नवीन डावाने उस्तादजी आपल्याला कटोऱ्यासारखा फेकून तर देणार नाहीत?", या भीतीने तो बिचारा व्याकुळ झाला. त्याच्या घशाला कोरड पडली व हातपाय निर्जीव झाल्यासारखे भासू लागले!

तोच उस्तादजी समोरून कुस्तीच्या रिंगणाकडे येताना त्याने पाहिले. या उतार वयातही त्यांचा चेहरा रुबाबदार दिसत होता. मुद्रेवर प्रसन्नता होती, चालण्यात वेग होता. लोकांनी त्यांच्या नावाचा प्रचंड जयजयकार करायला सुरुवात केली. सर्वांना हात जोडून अभिवादन करीत ते राजासमोर निर्भयपणे उभे राहिले. त्यांच्या खांद्यावर एक झोळी लटकलेली दिसत होती.

उस्तादजींचा हा आत्मविश्वास पाहून शिष्य पार विरघळला. स्वतःच्या पराभवाचे चित्र, स्वतःची पुढे होणारी नाचक्की त्याच्या डोळ्यांसमोर नाचू लागली! त्याने उस्तादजींचे चरण धरले व म्हणाला,

"गुरुदेव, मला क्षमा करा. तुमच्याशी कुस्ती खेळण्याचा मूर्खपणा मी यापुढे कधी करणार नाही! पण मला एकच सांगा, हा 'कटोरा डाव' आहे तरी कसा? आणि मला तो तुम्ही कधी शिकविला का नाही?"

गुरुजींनी मंदहास्य केले. आपल्या झोळीतून त्यांनी नुकताच घासलेला कटोरा बाहेर काढला व म्हणाले, "बेटा, हाच माझा कटोरा डाव! खास आजच्या दिवसासाठीच मी तो राखून ठेवला होता."

卐 卐 卐

म. ग्रं. सं. ... शाखा.
दा. क्र. ११६२
विषय किशोर ... ६४४

# १ ॐ ॐ ॐ ॐ बंधन आहे तरी कुठे ?

एका गावात एक कुंभार राहात असे. त्याने पाच गाढवे बाळगली होती. माती वहायला, मडकी बाजारात न्यायला त्यांचा उपयोग होई.

या गाढवांना शेजारच्या माळरानात चरायला न्यायला एक गुराखी मुलगाही त्या कुंभाराने नोकरीस ठेवला होता. हा मुलगा दररोज सकाळी गाढवांना रानात घेऊन जाई व सूर्य मावळताना परत आणी. जाताना तो आपल्याबरोबर पाच काथ्याची दोरखंडे नेत असे. दुपारच्या वेळी, तो प्रत्येक गाढवाच्या पायात दोरखंड बांधून, त्यांना निरनिराळ्या झाडाखाली उभे करून ठेवी व आपण न्याहारी करून थोडी विश्रांती घेई. संध्याकाळी सर्व गाढवांना दोरखंडे सोडून घरी आणी. असा त्याचा कार्यक्रम कित्येक महिने चालला होता.

एके दिवशी थोडी गफलत झाली. रानात जाताना एक दोरखंड कुठे तरी हरवले! दुपारची वेळ झाली. चार गाढवे झाडाखाली बांधली गेली. पण पाचवे गाढव दोरखंड नसल्यामुळे मोकळे राहिले व सारखे हुंदडत राहिले. ते त्या मुलाला न्याहारी करू देईना की विश्रांती घेऊ देई ना! तो मुलगा रडकुंडीस आला.

त्याच रस्त्याने जाणाऱ्या एका साधूने हे पाहिले. साधू महाराजांना मुलाची दया आली. ते म्हणाले, "हे पहा, ह्या गाढवाला त्याच्या नेहमीच्या झाडाखाली उभे कर आणि खाली वाकून लुटुपुटीने पाय बांध आणि पहा गंमत!"

मुलाने साधूंनी सांगितल्याप्रमाणे त्या गाढवाचे पाय बांधल्यासारखे केले आणि काय आश्चर्य! ते पाचवे गाढव त्या जागेवर अगदी स्थिर उभे राहिले! गुराख्याने साधूचे उपकार मानले, सावकाशपणे न्याहारी केली, विश्रांती घेतली. गाढव अगदी खरेखुरे बांधल्यासारखे स्थिर राहिले होते.

ऊन कमी होऊ लागले. निघायची वेळ झाली! गुराख्याने चारही गाढवांना बांधलेली दोरखंडे सोडली व ती घरच्या दिशेला लागली. पाचवे गाढव मात्र काही केल्या हलेना! गुराख्याने त्याला चुचकारले, पाठीत रट्टे दिले, तरी ते खांबासारखे उभे. पाऊल काही केल्या उचलीना!



त्या गुराख्याच्या मनात एक शंका आली! त्या साधूने ह्या गाढवावर काही जादूटोणा तर केला नसेल? त्याने धावत जाऊन त्या साधूची कुटी शोधून काढली व रडत रडत म्हणाला, "महाराज, ते मघाचे दोरखंडाशिवाय बांधलेले गाढव काही केल्या हलतच नाही! काही उपाय सांगा महाराज!"

साधुमहाराज हसू लागले. ते म्हणाले, "वेड्या, इतका का घाबरतोस? लुटुपुटीने जसं त्याला तू बांधलंस, तसं लुटुपुटीने दोरखंड सोडल्यासारखं कर. मग पहा गाढव घरी येतं की नाही ते?"

तो गुराखी पुन्हा गाढवाजवळ आला. बिचारे कसे पुतळ्यासारखे स्थिर उभे होते! गुराखी खाली त्याच्या पायाजवळ वाकला. त्याने दोरखंड सोडत असल्याचे हावभाव केले. आणि काय नवल, गाढव तडक धावत सुटले!

आपण ईश्वराचे साक्षात अंश आहोत. आपला विकास थांबवू शकेल, अशी कोणतीच शक्ती जगात नाही! आपण ज्याला बंधन समजतो, ते वास्तविक आहे तरी कुठे?

卐 卐 卐

# १० ॐ ॐ ॐ ॐ "माझ्या बाळावरून तुझ्यासारखे छप्पन्न ओवाळून टाकीन!"

एका गावात एक वृद्ध आजीबाई राहात होती. तिच्या नात्यागोत्याचे कुणी नव्हते, की तिला कुणाचा आधार नव्हता! तिचे शरीर तर हळूहळू थकत चालले होते.

योगायोगाने एक थोर महात्मा त्या गावात उतरला होता. आजीबाई त्याच्याजवळ गेल्या व म्हणाल्या, "महाराज, माझं शरीरं वृद्ध होत चाललं आहे. जीवनाच्या अखेरीस श्रीकृष्णसेवा करण्याची माझी इच्छा आहे. भजन-पूजनाचा काही मार्ग दाखवा, महाराज."

त्यांच्या समोरच एक लहान वाटोळासा दगड पडलेला होता. महात्म्यांनी तो उचलून त्या वृद्धेजवळ दिला व म्हटले, "आजीबाई, हाच तुझा श्रीकृष्ण बरं का! याला तुझा छोटा बाळ समज. त्याला खेळव, लालन-पोषण कर, मग तुला सर्व काही मिळेल."

आजीबाईच्या मनात आनंद फुलून आला. आपल्या 'गोलमटोल' बाळाला तिने अगदी पदराखाली झाकून घरी नेले, मऊ मऊ दुलईवर त्याला निजविले. रात्रंदिवस ती त्याची सेवा करू लागली.

आपल्या बाळाला ती सुवासिक उटणे लावी, स्नान घाली, त्याला काजळ लावी, कपडे करी. त्याला ती क्षणभरही विसंबत नसे. निजताना त्याला आपल्या कुशीत घेई. आपला हा अगदी खराखुरा बाळ आहे अशी तिची दृढ भावना होती.

एका साध्या लहान दगडावर इतके प्रेम करणाऱ्या आजीबद्दल गावात चर्चा होऊ लागली. एके दिवशी गावातील थट्टेखोर लोकांनी एक अफवा उठविली की, "गावात एक लांडगा शिरला आहे. तो नजर चुकवून घरात शिरतो व लहान बाळांना पळवून नेतो....."

ही लांडग्याची अफवा त्या आजीबाईच्या कानावर घातली गेली.

"अगबाई, माझ्या बाळाला हा दुष्ट लांडगा पळविणार तर नाही ना?" या कल्पनेने ती आजी व्याकुळ झाली!

पण प्रसंगाने तिला धैर्य शिकविले. "मी जिवंत असताना माझ्या बाळाला कोण हात लावतं, ते पाहते" या खंबीर आत्मविश्वासाने ती उभी राहिली. तिने दिवसभर बाळाचे सर्व काही केले व तो रात्री झोपी गेल्यावर हातात भली मोठी लाठी घेऊन आपल्या घराच्या उंबरठयात ती बसून राहिली. लांडगा रात्रीचा जर लपून छपून आला तर त्याचे कंबरडेच मोडण्याचा बेत तिने केला होता.

दिवसामागून दिवस जाऊ लागले. दिवसभर ती आजी आपल्या बाळाचे करी व रात्रभर जागून काढी. आपल्या बाळाचे रक्षण करणे, हाच एक ध्यास तिला होता. आपला बाळ ईश्वर आहे, सर्वशक्तिमान आहे, ही कल्पनाही तिच्या मनाला शिवत नव्हती!

आजीबाईची ती तपश्चर्या पाहून भगवान श्रीकृष्णांना राहवेना. आपल्या तेजोमय प्रकाशात आजीबाईच्या दारात येऊन ते उभे राहिले.

"कोण आहे रे ते? तिथे लांबच उभा रहा, तुझ्या आवाजाने माझा बाळ विनाकारण जागा होईल.' –आजीबाई मोठयाने ओरडली.

"आई, तू रोज ज्याची सेवा करतेस, तोच मी तुझा बाळ." भगवान श्रीकृष्ण म्हणाले.

"अरे जा, माझा बाळ म्हणे तू! तुझ्यासारखे झगमगणारे शेकडोजण माझ्या बाळावरून ओवाळून टाकीन! माझ्या बाळाच्या नखाच्या योग्यतेचा तरी आहेस का तू?"

आजीचे हे शब्द ऐकून श्रीकृष्णाच्या चेहऱ्यावर हसू उमटले.

"आई, तू असं कर–तुझ्या 'गोलमटोल' बाळाला घेऊन माझ्याबरोबर गोलोकात चल." भगवान श्रीकृष्ण म्हणाले.

"तुझ्या गोलोकात लांडगे आहेत का?" आजीबाईने काळजीने विचारले.

"छे ग आई, तिथे लांडगे वाघ तर नव्हेत, पण साधी माशी, मच्छरही सापडणार नाहीत."

"ठीक आहे, चल तर. तिथे गोलोकात माझा बाळ तरी सुखाने राहील", असे म्हणून त्या आजीबाईने आपल्या बाळाला काळजीपूर्वक उचलले आणि भगवान कृष्ण तिला घेऊन गोलोकात गेले.

केवळ श्रद्धेने ईश्वरप्राप्ती होऊ शकते, त्याला ज्ञानाची आवश्यकता असतेच असे नव्हे.

卐 卐 卐

# ११ ॐ ॐ योगक्षेमं ॐ ॐ वहाम्यहम् ।

[भगवंताची वाङ्मयी मूर्ती म्हणून श्रीज्ञानेश्वरांनी जिचे माहात्म्य गायिले आहे, अशी श्रीमद्‌भगवद्गीता हिंदुधर्मातील परम पवित्र ग्रंथ होय. महाभारताच्या भीष्मपर्वात अवघ्या सातशे श्लोकांत विस्तारलेल्या श्रीगीतेसंबंधी आजवर शेकडो विवरणात्मक टीका व शेकडो जीवनदायी प्रसंग निर्माण झालेले आहेत.]

पंडित अर्जुनमिश्र यांची संपूर्ण महाभारतावरील टीका उपलब्ध आहे. जगन्नाथपुरीच्या पवित्र परिसरात त्यांचे चिंतन–लेखन सुरू असे.

गीतेवर टीका लिहिताना नवव्या अध्यायातील–

**अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते।**
**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥**

–या श्लोकापर्यंत ते येऊन पोहोचले होते. "अनन्य भावाने माझे चिन्तन व भजन करून जे भक्त माझ्याशी एकरूप होतात त्यांचा योगक्षेम (उदरनिर्वाह) मी वाहतो" असे या श्लोकात भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगत आहेत.

"**वहाम्यहम्**' या शब्दाचा अर्थ "मी वाहून नेतो" असा आहे. अर्थात् पंडितमिश्रांना हे शब्द रुचले नाहीत. "भगवान जास्तीत जास्त भक्ताला योगक्षेम '**देतील**' तो 'वाहून' कशाला नेतील?" असे त्यांना वाटले.

अर्जुनमिश्रांनी लगेच आपली लेखणी उचलली, लाल शाईचा स्पष्ट फटकारा मारून त्या पोथीतील 'वहाम्यहम्' शब्द खोडला व त्याच्यावर '**ददाम्यहम्**' हा शब्द लिहिला. ('ददाम्यहम्' म्हणजे '**मी देतो**'), आणि ते समुद्र–स्नानास निघून गेले.

दुपारची वेळ झाली. पंडितजींच्या घरी गरीबी होती. त्या दिवशी तर घरात पीठ, डाळही शिल्लक नव्हती! पंडीतजींची पत्नी सचिंत होती.

तेवढ्यात समोरून एक ८–९ वर्षांचा छोटा बालक डोक्यावर छोटीशी टोपली कशीबशी सावरीत घराकडे येत असलेला तिला दिसला. पंडितजींसाठी आणलेला शिधा त्या मुलाने मिश्रजींच्या पत्नीजवळ दिला. तोच त्या माऊलीचे लक्ष त्या गोजिरवाण्या बालकाच्या गालाकडे गेले. त्याच्या गालावर एक लालभडक ओरखडा पडलेला तिने पाहिला—

"अरे बाळ, तुला कुणी रे मारलं?" त्या माऊलीने कळवळून प्रश्न केला.

"मिश्राजींनी मारलं आई." तो बालक मान खाली घालून म्हणाला....

तो मुलगा शिधा देऊन निघून गेला खरा, पण त्या माऊलीचे अंतःकरण दुःखाने व संतापाने तळमळत होते. या एवढ्या कोमल सुंदर बाळाला असे मारायचे म्हणजे काय?

पंडीतजी समुद्र-स्नानाहून घरी येण्याचा अवकाश, तोफांची सरबत्ती सुरू झाली होती!

"तो एवढा सुकुमार सुंदर बालक आपल्यासाठी डोक्यावर शिधा घेऊन आलेला-त्याला तुम्ही इतक्या निष्ठूरपणे मारलंत, त्याचं तोंड रक्तबंबाळ केलंत- म्हातारपणी बुद्धी तर गेली नाही ना?" श्रीमतीजी म्हणाल्या.

क्षणभर मिश्रजींना काहीच कळेना! "कोण बालक आणि मी कशाला मारू?" ते स्वतःशीच जणू पुटपुटले—

तोच सकाळी वाचलेला गीतेतील श्लोक त्यांच्या दृष्टीसमोर आला. **भक्ताचा योगक्षेम मी वाहून नेतो**, हे सांगणारा भगवंताचा '**वहाम्यहम्**' शब्द त्यांना आठवला व त्यावर आपण दिलेला लाल शाईचा फटकाराही त्यांना जाणवू लागला! गीतेचे प्रवक्ते भगवान स्वतः बालक बनून त्यांच्या घरी येऊन गेले होते!

डोळ्यांतून ओघळणारे अश्रू मिश्रजींनी टिपले, पुन्हा पोथी उघडली आणि 'ददाम्यहम्' शब्द काढून टाकून तो पूर्वीप्रमाणे 'वहाम्यहम्' लिहिला.

卐 卐 卐

## १२ ॐ ॐ ॐ ॐ मला 'राजा' करू नका महाराज!

पद्मपुराणात आलेली ही एक बोधप्रद कथा आहे. दुर्वास ऋषींचे नाव सर्वांना ठाऊक आहे. भक्तांची परीक्षा घेणारे, शीघ्रकोपी मुनी म्हणून त्यांची ख्याती आहे! परंतु त्यांच्या स्वभावाचा विशेष हा की ते ज्या भक्ताची परीक्षा घेतात त्याची भक्ती अधिक उज्ज्वल होते व एखादा महत्त्वाचा मंगल विचार जगात मांडला जातो.

दुर्वास मुनींनी एके काळी घोर तपश्चर्येला सुरुवात केली होती. ज्याच्या धारणेने समस्त विश्वाचा व्यवहार चालतो त्या धर्माचा म्हणजे धर्मतत्त्वाचा साक्षात्कार–प्रत्यक्ष दर्शन व्हावे ही त्यांची इच्छा होती. परंतु दुर्वासांची खूप तपश्चर्या होऊनही धर्म दर्शन देईना! दुर्वास मुनी साहजिकच संतापले व हातात जल घेऊन त्यांनी धर्माला शाप देण्याचा भयंकर निर्धार केला–

प्रकरण त्रिकोपाला गेलेले पाहून 'धर्म' अतिशय घाबरला व थरथर कापत आपल्या परिवारासह दुर्वासांसमोर येऊन उभा राहिला. "क्षमा करा मुनिवर–" धर्म याचना करू लागला—

"या दुर्वासाला 'क्षमा' हा शब्दच ठाऊक नाही," दुर्वास रागाने म्हणाले, "माझ्या उपेक्षेबद्दल तुला भोगावा लागणारा शाप ऐक–तुला पृथ्वीवर येऊन तीन रूपं घ्यावी लागतील. तुला चाण्डाळ व्हावं लागेल, शूद्र व्हावं लागेल व राजाही व्हावं लागेल."

"क्षमा करा महाराज," धर्म विनम्रतेने म्हणाला. "चाण्डाळ व्हायला माझी हरकत नाही. मी त्या रूपात समाजाची सेवा करीन, पवित्र राहीन. तुमच्या शापाप्रमाणे शूद्र व्हायलाही माझी तयारी आहे. मी त्याही रूपात लोकांची सेवा करीन. माझी सहनशक्ती वाढेल, माझी तपस्या होईल. पण कृपा करा आणि मला 'राजा' बनवू नका! मला जर राज्यपद मिळाले तर मी कदाचित सत्ताभिलाषी बनेन, उन्मत्त होईन, अन्यायी होईन, माझ्या हातून पाप घडत जाऊन माझी अधोगती होईल! मला राज्यपद नको महाराज."

दुर्वासांनी अर्थातच धर्माची विनंती मान्य केली नाही. धर्माला तीनही रूपे घ्यावी लागली. राजा हरिश्चंद्राच्या सत्त्वपरीक्षेत हरिश्चंद्राला विकत घेणारा चांडाळ म्हणजे स्वत: धर्म होता. महाभारतातील दासीपुत्र विदुराचे रूपही धर्मानेच धारण केले व पांडवांचा वडील बंधू बनून युधिष्ठिराच्या रूपात राज्यपदही धर्माला पत्करावे लागले!

आज देशात सत्तेसाठी होणारी स्पर्धा व सत्तेतून निर्माण होणारे अनर्थ आपण पाहात आहोत. प्रत्यक्ष धर्मालाही 'राजा' होणे मंजूर नव्हते ही गोष्ट या संदर्भात ध्यानात ठेवायला हवी.

卐 卐 卐

# १३ ॐ ॐ ॐ ॐ —याच्या मोबदल्यात काही मागू नकोस !

एका शहरात दोन भाऊ राहात होते. वडील भाऊ ईश्वरभक्त होता. तो नियमितपणे देवाची पूजा करी, भक्ती करी, आपल्या गुरुदेवांची सेवा करी, साधुसंतांचा आदर-सन्मान करी. परंतु धाकट्या भावाचे सारेच निराळे होते! त्याला ईश्वर मुळीच मान्य नव्हता. देवाचे नाव तो चुकून कधी घेत नसे! वडील भावाला साहजिकच धाकटयाबद्दल मोठी चिंता वाटे; आपल्याप्रमाणे त्यानेही ईश्वर-भक्तीत थोडा तरी काळ घालवावा, निदान देवाचे नाव तरी घ्यावे अशी त्याची इच्छा होती.

एके दिवशी कुणी एक भव्यदेही तेजस्वी साधू त्यांच्या घरी उतरले. मोठ्या भावाने त्यांचे स्वागत केले, भोजन दिले व शेवटी धाकटया भावाविषयीची आपली मनोव्यथा त्यांच्या कानावर घातली. योगायोग असा की धाकटा भाऊ त्याच वेळी त्या ठिकाणी उपस्थित झाला.

"हा माझा धाकटा भाऊ जेणेकरून ईश्वराचं नाव घेईल असं काही करा महाराज," वडील भावाने साधू महाराजांना हात जोडून विनंती केली.

त्या बलवान साधू महाराजांनीं एक वेळ त्या धाकटया भावाकडे पाहिले व एकाएकी उठून त्याला जमिनीवर आडवे पाडले! आपल्या हाताने त्याला दाबून ठेवीत ते म्हणाले, "घे, घे नारायणाचं नाव. बोल नारायण–नारायण–बोलतोस की नाही?"

धाकटा भाऊ ह्या आकस्मिक हल्ल्याने गांगरून गेला होता. पण तरीही त्याने आपला हेका सोडला नाही. "नाही, नाही, प्राण गेला तरी त्या **नारायणाचं** नाव मी घेणार नाही," तो म्हणाला.

त्याच्या तोंडून "नारायण" शब्द निघण्याचा अवकाश! त्या साधूंनी त्याला मोकळे सोडले व ते म्हणाले, "बेटा, माझं काम झालं आहे. पण आता मी काय सांगतो ते नीट लक्षात ठेव. **तू आता जे नारायणाचं नाम घेतलंस त्याच्या मोबदल्यात काही म्हणून मागू नकोस!** जा, तुझं कल्याण होईल."



धाकटा भाऊ रागाने तांबडालाल झाला होता. साधू महाराज मात्र प्रसन्नपणे हसत होते.

\+ + + +

या घटनेनंतर बरीच वर्षे लोटली. धाकट्या भावाचा स्वभाव काही बदलला नाही व त्याने नारायणाचे नाव पुन्हा कधीही घेतले नाही! पुढे वयोमानाने त्याचे शरीर काम करीनासे झाले व शेवटी मृत्यूनंतर यमराजासमोर हजर राहाण्याची त्याच्यावर पाळी आली.

"हे बघ, भल्या गृहस्था," यमराज त्याच्याकडे पाहात म्हणाले, "उभ्या आयुष्यात तू फक्त एकदा—ते बलवान साधू तुमच्या घरी आले असता—नारायणाचं नाव घेतलं आहेस. या नामाच्या मोबदल्यात तुला काय हवं ते चटकन माग."

यमराजाचे शब्द ऐकून धाकट्या भावाची पूर्वस्मृती जागृत झाली. त्या साधूमहाराजांचे शब्द त्याला आठवले. तो यमराजाला काकुळतीने म्हणाला, "क्षमा करा महाराज. मी नारायणाचं नाम स्वखुषीने मुळीच घेतलं नव्हतं—"

"तुझ्या खुषी-नाखुषीचा प्रश्न इथे नाही. तू एक वेळ नारायणाचं नाव घेतलं आहेस आणि तुला त्याबद्दल मोबदला मिळालाच पाहिजे. यमराजाचा दरबार हा

न्यायाचा दरबार आहे. बोल, काय हवं तुला? स्वर्ग हवा, की कामधेनू हवी कल्पवृक्ष हवा की अमृत हंव, बोल काय हवं. ते बोल–" यमराज म्हणाले.

"छे छे, महाराज, त्या नामाच्या मोबदल्यात मला काहीच नको" धाकटा भाऊ धीटपणे म्हणाला. त्या साधूमहाराजांचे शब्द त्याच्या कानात घुमत होते.

आता मात्र यमराजासमोर एक अभूतपूर्व प्रश्न उभा राहिला! एके वेळच्या नामाच्या मोबदल्यात या मनुष्याला काही तरी देणे तर जरूर होते. पण द्यायचे काय? नारायणाच्या नामाचे मोल कशाने होईल? नामाच्या मोबदल्यात प्रत्यक्ष इंद्रपदही देण्याची यमराजाची तयारी होती! पण हा मनुष्य असा विचित्र की तो काही मागतच नव्हता.

यमराजांची बुद्धी काही चालेना, म्हणून त्या भावाला घेऊन ते चतुर्मुख ब्रह्मदेवाकडे निघाले. ब्रह्मदेवासमोर ही समस्या मांडली गेली, पण ब्रह्मदेवालाही उत्तर सुचेना! 'नारायणा'च्या मोबदल्यात द्यायचे काय?

शेवटी ब्रह्मदेव आपल्या आसनावरून उठले व यमराजाबरोबर कैलासावर आले. सोबत तो भाऊ होताच. श्रीशंकरांचा सल्ला विचारण्यात आला. पण त्यांच्याकडेही प्रश्नाचे उत्तर नव्हते! नारायणाच्या नावाचा मोबदला कोणता?

शेवटी ह्या प्रश्नाचा खुलासा प्रत्यक्ष भगवान नारायणच करतील या विचाराने यमराज, ब्रह्मदेव व शंकर त्या भावाला घेऊन वैकुंठ लोकाकडे निघाले. तो धाकटा भाऊ थकल्यामुळे वाटेतच बसू लागला! तेव्हा या तिघांनी परस्परांच्या मदतीने त्याला उचलून खांद्यावर घेतले व ही 'मिरवणूक' श्रीलक्ष्मीनारायणाच्या महालात दाखल झाली.

प्रत्यक्ष ब्रह्मा, शंकर व यमराज आपल्या कुणा भक्ताला स्वतः उचलून घेऊन येत आहेत, हे पाहून भगवान नारायण सिंहासनावरून उठून उभे राहिले. ब्रह्माशंकरांनी आपली समस्या सांगितली, "या मनुष्याने एक वेळ आपलं नाव घेतलं आहे भगवान, पण तो या नामाच्या मोबदल्यात काही मागत नाही! याला काय द्यायचं महाराज?"

श्रीनारायणाच्या मुखावर तेजोमय हास्य झळकले. ते म्हणाले, "याला नामाचा मोबदला जो मिळायचा, तो कधीच मिळून चुकला आहे. आता हा इथेच माझ्याजवळ राहील," असे म्हणून भगवंतानी आपल्या भक्तवत्सल भुजा पसरल्या व त्या धाकट्या भावाला आपल्या हृदयाशी गाढ आलिंगन दिले.

卐 卐 卐

# १४ ॐ ॐ ॐ ॐ शेवटी पत्नीने वाचविले!

मानवी जीवनात निश्चयाला फार मोठे महत्त्व आहे. आपल्याला काय मिळवायचे आहे, आपले ध्येय कोणते याबद्दल आपला निश्चय स्पष्ट हवा.

एकदा एक याचक राजाकडे गेला व राजाजवळ त्याने धन मागितले. राजा म्हणाला, "भल्या गृहस्था, तू माझ्या कोषागारात जा व तुला सर्वांत आवडेल असे कोणतेही एक रत्न घेऊन जा. तुला एक तासाचा अवधी मी देतो."

तो याचक त्या कोषागारात गेला. हजारो रत्ने तिथे पडलेली. कुठले घ्यावे व कुठले ठेवावे? हे रत्न उचल, ते ठेव, असे करीत तास संपला. पहारेकरी आले व त्या याचकाला रिकाम्या हातांनी बाहेर पडावे लागले.

आपल्या जीवनाची गोष्ट अशीच. या जगात अगदी थोड्या वेळात जास्तीत जास्त मूल्यवान वस्तू जो मिळवील त्याचा विजय होणार आहे.

अशीच ही एक कथा—

एक मनुष्य आपले घरदार सोडून बारा वर्षे अरण्यात तप करीत बसला होता. तपाच्या अखेरीस त्याला त्याच्या इष्ट देवतेचे दर्शन झाले. ती देवता म्हणाली, "तुला मी तीन वर देते. यापुढे तुझ्या मनात फक्त पहिले **तीन** जे **संकल्प** येतील ते तत्काल सिद्धीस जातील."

त्या मनुष्याला खूप आनंद झाला. तपश्चर्येचे सार्थक झाल्यासारखे त्याला वाटले. घरी येताना वाटेत त्याला एक गर्द छायेचे झाड दिसले. शेजारी सुंदर ओढा खळाळत होता. ऊन खूप तापलेले होते. तो मनुष्य त्या ओढ्याचे पाणी प्याला व त्या झाडाच्या छायेत त्याने अंग टाकले! त्याच्या मनात लगेच संकल्प उठला, "वा, किती बरं वाटतं आहे. इथे असाच झोपून राहिलो तर—. झाले, देवतेच्या वरदानानुसार त्या क्षणी तो त्या जमिनीवर चिकटून बसला!

"या रानात या आपत्तीतून आता सोडविणार कोण? आपली पत्नीच इथे आली तर काही मार्ग काढील"— त्याच्या मनात दुसरा संकल्प आला. देवतेच्या वरदानाप्रमाणे त्याची पत्नी तिथे तत्क्षणी हजर झाली!

त्या बिचाऱ्याने आपली सारी कर्मकथा पत्नीला सांगितली. "आता फक्त एकच संकल्प बाकी आहे. काय मागू ते सांग–" तो कळवळून म्हणाला.

"आता काय मागणार कपाळ?" ती पत्नी म्हणाली, "आता या जमिनीवरून मोकळे व्हा आणि घरी सुखरूप या की झालं!"

त्या मनुष्याने त्याप्रमाणे तिसरा संकल्प मनात आणला. लगेच स्वारी जमिनीवरून मोकळी झाली व बारा वर्षांपूर्वी जसा रिकाम्या हातांनी बाहेर पडला होता तसाच रिकाम्या हातांनी तो घरी आला!

卐 卐 卐

## १५ ॐ ॐ आम्ही आहोत ॐ ॐ तेच बरे!

रामायणाबद्दल अनेक कथा तुम्हाला ठाऊक असतील, परंतु एक निराळीच गंमतीदार कथा तुम्ही आता वाचणार आहात.

सत्यवचनी प्रभू रामचंद्र, दशरथ राजाने कैकयी मातेला दिलेल्या वचनानुसार वनवासाला गेले. वाटेत गौतमांची अहिल्या शिला होऊन पडली होती. त्या शिलेला रामचंद्रांचा चरणस्पर्श होताच त्या शिलेतून अहिल्या निर्माण झाली व तिचा उद्धार झाला. यानंतर घडलेला हा प्रसंग आहे—

श्रीरामचंद्र दण्डकारण्यात राहात होते. बंधू लक्ष्मण त्यांच्याकरिता, सीतामाईकरिता कंदमुळे, फळे आणी, पर्णकुटीवर जागता पहारा ठेवी. सीतामाई रामचंद्रांची मनोभावे सेवा करी. पर्णकुटी स्वच्छ ठेवणे, रामरायाच्या स्नानसंध्येची व्यवस्था करणे, पाणी भरून ठेवणे इत्यादि गोष्टी सीतामाई करायची.

दंडकारण्य ही मोठी तपोभूमी होती. हजारो ऋषी, साधू त्या काळी तिथे तपस्या करीत, साधना करीत. हे साधू नदीवर जातायेताना, किंवा कंदमूळां-साठी अरण्यात विचरण करताना श्रीरामचंद्र–सीतामाईंना पाहात. हळूहळू त्या विरक्त साधूंच्या मनातही एक वेगळाच संकल्प उभा राहू लागला!

श्रीरामचंद्राप्रमाणे आपणही विवाह केला तर काय हरकत आहे, असे त्या साधूंच्या मनात आले! सीतामाईसारखी पत्नी मिळाली तर ती आपली सेवा

करील, पर्णकुटीची झाडलोट करील, आपल्या मागील दगदग थोडी कमी होईल, असा पोक्त विचार त्यांनी केला.

झाले, ते हजारो साधू एकत्र आले. विवाह करायचा तर निश्चय पक्का झाला. पण एवढ्या 'वरां'ना हजारो 'वधू' कुठून मिळणार? लगेच सर्वजण बिचारे चिन्ताक्रान्त झाले. पण एकाने शक्कल काढली. तो म्हणाला, "मित्रांनो, प्रभू रामचंद्र साक्षात् आपल्याजवळ असताना काळजी कशाला हवी? त्यांनी नाही का, आपल्या चरणस्पर्शाने एका शिलेतून अहिल्या निर्माण केली? त्यांनाच सांगू की या दंडकारण्यात ज्या हजारो शिला पडलेल्या आहेत, त्यांतून आमच्यासाठी एकेक वधू निर्माण करा म्हणून—'

ही युक्ती ऐकून सर्वांनी अगदी मनापासून माना डोलविल्या व त्या हजारो साधूंनी प्रभू रामचंद्रांकडे आपला मोर्चा वळविला!

रामचंद्रांनी आपल्या दयाशील अंतःकरणाने त्या साधूंचा विवाहाचा संकल्प समजावून घेतला व काही तरी बोलून त्यांना तात्पुरते परत पाठविले. परंतु साधूंच्या तपस्येत निर्माण झालेले हे अकल्पित विघ्न पाहून रामचंद्रांना काहीशी चिंता वाटू लागली. त्यांनी लगेच आपल्या योगमायेला पाचारिले व तिला म्हटले, 'जा बाई, रावणाकडे जा आणि त्याला सीताहरण करण्याची बुद्धी दे.'

योगमायेने रामचंद्रांच्या आदेशानुसार काम केले. रावणाला सीतेचे हरण करण्याची दुर्बुद्धी सुचली व त्याने वेषांतर करून सीतेला लंकेत नेले.

इकडे सीतेच्या वियोगाने रामचंद्र अतिशय दुःखी झाले. 'हा सीते, हा सीते' असा विलाप करीत ते दिवसरात्र दंडकारण्यात हिंडत, झाडावेलींना, पशुपक्ष्यांना सीतेबद्दल माहिती विचारीत. त्यांचे खाणे पिणे तुटले, प्रचंड शोकाने जणू वेड लागायची त्यांना पाळी आली—

विवाहाचा संकल्प मनात बाळगणारे ते साधू प्रभू रामचंद्राचा हा विलाप प्रत्यक्ष पाहात होते. "पत्नीसाठी एवढा शोक! एवढा मनस्ताप! नको रे देवा ते लग्न, त्यापेक्षा आम्ही एकटे आहोत तेच बरे" असे म्हणून त्या साऱ्यांनी विवाहाचा विचार आपल्या मनातून साफ काढून टाकला. ते हजारो साधू आपल्या स्नानसंध्येत, तपःसाधनेत, पुन्हा मग्न होऊन गेले—

पुढे घडलेले रामायण सर्वांना ठाऊक आहेच.

卐 卐 卐

# १६ ॐ ॐ ॐ ॐ "माझ्यापासून दूर जाऊ नकोस–"

गुरुदेव ही ईश्वराची साकार मूर्ती. आपल्या शिष्याच्या कल्याणासाठी गुरुदेव अहोरात्र तत्पर असतात. आपल्या गुरुजींच्या आज्ञेत राहाणे, हे मात्र प्रत्येक शिष्याचे परम कर्तव्य होय.

एका गावात एक गुरु-शिष्य राहात होते. शिष्य सेवाभावी होता, स्वभावाने चांगला होता. परंतु दुर्दैवाने हुक्का ओढण्याचे वाईट व्यसन त्याला जडलेले होते.

गुरुदेवांचा अंतकाळ जेव्हा समीप आला, तेव्हा शिष्याने विचारले,

"तुमच्यानंतर माझं कसं होणार, महाराज?"

"बेटा, तुझ्यात दुसरा कोणताच दोष नाही. तुला हुक्क्याचं व्यसन आहे इतकंच."

"काय करू महाराज? हे व्यसन या जन्मी तरी सुटेलसं दिसत नाही." शिष्य खिन्नपणे म्हणाला.

"तू असं कर. तुझ्या मृत्यूनंतर तुला यमराज विचारतील की तुला पुण्याचं फळ अगोदर हवं की पापाचं? त्यावेळी पुण्याचं फळ अगोदर माग म्हणजे तू माझ्याकडे येशील. पुढील काय ते मी पाहून घेईन." गुरुजी म्हणाले.

यथाकाली शिष्य मृत्यू पावला व त्याला यमराजासमोर नेण्यात आले. गुरुजींनी सांगितल्याप्रमाणे त्याने पुण्याचे फळ प्रथम मागितले व त्याची रवानगी स्वर्गलोकात त्याच्या गुरुदेवांजवळच करण्यात आली. साहजिकच शिष्याला मोठा आनंद झाला व स्वर्गात तो गुरुजींची सेवा–पूजा मनोभावे करू लागला.

शिष्याचा पुण्याचा साठा जेव्हा संपला तेव्हा यमदूत त्याला नरक लोकात घेऊन जाण्यासाठी आले. शिष्य घाबरला व गुरुजींच्या झोपडीत जाऊन त्यांच्या पवित्र चरणांजवळ बसला. गुरुजींनी सारे ओळखले. ते म्हणाले, "ठीक आहे, इथंच राहा. इथून बाहेर कुठे जाऊ नकोस."

यमदूतांचे काही चालेना. ते हताश होऊन यमराजाकडे आले व म्हणाले, "महाराज, तो शिष्य आपल्या गुरुजींजवळ बसला आहे. त्या पवित्र ठिकाणी आम्ही काही प्रवेश करू शकत नाही!"

यमराजांनी थोडा विचार केला व म्हटले, "तुम्ही आता इतकंच करा. गुरुजींच्या झोपडीसमोर सकाळ–संध्याकाळ हुक्का ओढीत बसा."

दोन–तीन यमदूत गुरुजींच्या झोपडीसमोर बसून रोज हुक्का ओढू लागले. शिष्याने ते पाहिल्यावर त्याची पूर्वीची हुक्का ओढण्याची इच्छा जागृत झाली! पण गुरुजींनी त्याला स्पष्टपणे बजावले, "बेटा, माझ्यापासून दूर जाशील तर पकडला जाशील, बघ."

एके दिवशी शिष्याला अगदी राहवेना! गुरुजी झोपडीत नाहीत, असे पाहून हुक्क्याचा एकच झुरका घेऊन लगोलग परत फिरू या–असा विचार त्या शिष्याने केला व आपल्या गुरुजींच्या झोपडीतून बाहेर पाऊल टाकले–

आणि त्याच क्षणी यमदूतांनी आपले काम साधले!

卐 卐 卐

# १७ ॐ ॐ ॐ ॐ जानकी मातेची करुणा

ईश्वर सर्वत्र भरलेला आहे. जिथे ईश्वर नाही अशी जागा, अशी वस्तू किंवा असा एखादा क्षणही या विश्वात कुठे सापडणार नाही. आपण जसे सूर्याच्या प्रकाशात वावरतो, तद्वत आपली बुद्धी ईश्वराच्या प्रकाशात वावरत असते.

ईश्वराचे कोणतेही रूप असो. राम, कृष्ण असो, की शिव असो, ईश्वर नेहमी करुणाघन आहे. कुणीही जीवाने, प्राण्याने, मनापासून हाक मारली, दर्शनाची खरोखर इच्छा धरली, आपले जीवन ईश्वराकडे वळविले–ईश्वराभिमुख केले–तर त्याला ईश्वरप्राप्ती होऊ शकते.

रामायणातील एक अर्थपूर्ण प्रसंग आहे. भगवान रामचंद्र व सीतामाई वनवासात असताना इन्द्राचा पुत्र जयन्त याने एकदा कावळ्याचे रूप घेतले व सीतेवर चंचुप्रहार केला. प्रिय पत्नीवर झालेला अन्याय प्रभू रामचंद्र सहन करणे शक्यच नव्हते! त्यांनी तिथेच पडलेले एक गवताचे पाते उचलून त्या कावळ्यावर फेकले—

रामरायाच्या संकल्पाने सुटलेल्या त्या दर्भात वज्राची शक्ती संचारली व त्याने जयंताचा पाठलाग सुरू केला. कावळा झालेला जयंत ब्रह्मलोकात, विष्णुलोकात, शिवलोकात गेला, परंतु रामचंद्राच्या दर्भापासून त्याला कोण वाचविणार ?

'आता प्रत्यक्ष रामरायाशिवाय तुला कुणी-कुणीही वाचवू शकणार नाही. त्यांना शरण गेलास तरच बचावशील', जयंताला जाणत्यांनी सल्ला दिला. कावळ्याच्या रूपात जयंत तडक रामचंद्राकडे निघाला.

रामचंद्र व सीतामाई एका शिलेवर बसली असता हा 'कावळा' उडत येऊन रामचंद्रांच्या पायाजवळ कोसळला ! भीतीने व परिश्रमांनी बिचारा धापा टाकीत होता. परंतु दुर्दैवाने त्याचे तोंड रामचंद्रांच्या दिशेला न पडता विरुद्ध दिशेला पडले म्हणून रामचंद्राची कृपा त्याच्यावर होईना ! त्याच्या सभोवार तो दर्भ घुमतच होता !

दीनवत्सल रामचंद्र शरणागत जयंताला उचलून त्याला अभय का देत नाहीत याचे प्रथम सीतामाईंना कोडे पडले. पण लगेच सारी गोष्ट त्यांच्या ध्यानात आली. ती थोर जगन्माउली लगेच खाली वाकली. स्वतःवर चंचुप्रहार करणाऱ्या त्या कावळ्याचे तोंड तिने आपल्या हातांनी हळुवारपणे रामचंद्राकडे वळविले व त्याला ईश्वराभिमुख केले.

तत्क्षणी प्रभु रामचंद्रांनी त्या कावळ्याला आपल्या कोमल हातांनी वर उचलले, त्याला छातीजवळ घेऊन कुरवाळले, अभय दिले व आपल्या स्नेहमयी दृष्टीने त्याला त्याच्या अपराधाबद्दल क्षमाही केली. त्याच्या सभोवार घोंघावणारा तो दर्भ केव्हाच नाहीसा झाला होता !

卐 卐 卐

# १८ ॐ ॐ ॐ ॐ ईश्वर स्वतः अवतार का घेतो ?

**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥**

[राखावया जगी संता दुष्टा दूर करावया ।
स्थापावया पुन्हा धर्म जन्मतो मी युगी युगी ॥ —गीताई]

श्रीमद्भगवद्गीतेतील वरील श्लोक व पू. विनोबाजींनी त्याचे 'गीताई'त केलेले सुंदर समश्लोकी भाषांतर अनेकांनी वाचले असेल. श्रीकृष्ण भगवान

द्रौपदीच्या हाकेसरसी धावत आले, तळ्यात मगराने पाय धरला असता गजेन्द्राने हाक मारली तेव्हा भगवान विष्णू गदाचक्र घेऊन धावले, ते प्रल्हादासाठी नृसिंह झाले, एकनाथाकडे त्यांनी श्रीखंड्या बनून पाणी भरले, जनाबाईबरोबर दळले, कबीराचे शेले विणले—असे भगवताचे भक्तावरील वात्सल्य, प्रेम प्रकट करणारे किती तरी प्रसंग आपणास आढळतात. भक्ताच्या रक्षणासाठी स्वत: धावत जाण्यात ईश्वराला खरा आनंद मिळत असतो.

याच संबंधातील बादशहा–बिरबलची ही गंमतीदार गोष्ट आहे—

बादशहा बिरबलबरोबर नेहमी थट्टा–विनोद करी. एकदा तो हसत हसत बिरबलला म्हणाला,

"बिरबल, तुमचा हिंदुधर्म मोठा गंमतीचा खरा! कुणी संकटात सापडलं तुमचा देव स्वत: धावून येतो म्हणे! अरे, तुमच्या ईश्वराच्या दरबारात नोकर-चाकर, सेनापती-प्रधान कुणीच नाहीसं वाटतं! भक्ताच्या रक्षणासाठी एकदा तरी कुणा सेवकाला—सरदारांना पाठवायचं की नाही"—असे म्हणून बादशहा अगदी पोट धरधरून हसला.

बिरबल क्षणभर काहीच बोलला नाही. "योग्य वेळी मी याचं उत्तर देईन खाविन्द," इतके बोलून तो गप्प राहिला.

—या गोष्टीनंतर महिनाभर लोटला.

बादशहा दररोज संध्याकाळी आपल्या राजवाड्यासमोरील भव्य पुष्करणीत—तलावात नौकाविहार करीत असे. सोबत सरदार-सेनापती असत, कधी राजपुत्र असत. छोट्या राजपुत्राला घेऊन त्याची दाईही नौकेत बसे.

एके दिवशी बिरबलने एक युक्ती केली. त्या छोटया राजपुत्राच्या—बाळाच्या—आकाराचा एक मेणाचा हुबेहूब बाहुला बनविला, त्याला राजपुत्राचे कपडे घालून त्या दाईच्या हातात दिले व तिच्या कानातही काही सांगितले.

त्या दिवशी नौकेत नेहमीप्रमाणे बादशहा, शेजारी बिरबल, मोठमोठे सरदार-सेनापती, सारे बसले होते. दाईने मेणाच्या राजपुत्राला गुंडाळून मांडीवर घेतले होते. नौका पुष्करणीच्या मध्यावर आली आणि काय झाले कुणास ठाऊक, त्या दाईच्या हातातून तो 'राजपुत्र' अचानक पाण्यात पडला!

"धावा, धावा, बाळ पाण्यात पडला—" दाई जोराने किंचाळली—



बादशहाच्या कानी शब्द पडायचा अवकाश, तो ताडकन उठला व बिरबलला व इतर सरदारांना बाजूला लोटून त्याने क्षणात उडी घेतली—

—तो मेणाचा बाहुला वर काढला गेला ! हे गौडबंगाल आहे तरी काय, याचा कुणालाच बोध होईना.

“माफ करा खाविन्द,” बिरबल बादशहाला हात जोडून म्हणाला, “मला एवढंच विचारायचं आहे, की आपण स्वतः पाण्यात उडी टाकायचे कष्ट कशाला घेतलेत ? तुमच्या शेजारी मी स्वत: होतो, इतके मोठे पराक्रमी सेनापती–सरदार होते, नोकर–चाकर होते—आम्हाला कुणालाही आज्ञा करायची होती. राजकुमारासाठी आम्ही प्राण दिले असते महाराज—”

“किती मूर्ख आहेस बिरबल !” बादशहा म्हणाला, “अरे, माझा लाडका सोनुला बाळ पाण्यात पडला असता मला स्वत: नको उडी घ्यायला ? अशा वेळी का मी दुसऱ्यांना हाका मारीत बसू ? आणि आज्ञा करायला तरी वेळ होता कुठे, पाण्यात घुसमटून बाळाचा प्राण जायला कितीसा उशीर !”

पुन्हा हात जोडून बिरबल म्हणाला, “महाराजांनी क्षमा करावी. मागे तुम्ही एकदा विचारलं होतं ना की आमचा ईश्वर भक्तासाठी स्वतः अवतार का घेतो म्हणून ? त्याचंही हेच कारण आहे. आम्ही सर्व ईश्वराची लाडकी लेकरंच आहोत. तुम्ही जसे तुमच्या बाळासाठी प्रेमाने स्वत: धावलात तसाच ईश्वर आम्हा लेकरांसाठीही स्वतःच धावून येत असतो.”

卐 卐 卐

# १९ ॐ ॐ ॐ ॐ श्रद्धेचे फळ

ईश्वरावरील श्रद्धा ही मानवी जीवनातील एक अद्भुत शक्ती आहे. श्रद्धेमुळे मनुष्य सद्गुणी होतो, निर्भय होतो व कोणत्याही प्रसंगाला सामोरे जाण्याचे धैर्य त्याच्यात निर्माण होते—

प्रवाशांनी भरलेली एक आगबोट महासागरातून चालली होती. समुद्रात प्रचंड वादळे अचानक निर्माण होत असतात. तसेच एक वादळ आले. एखाद्या लहान खेळण्याप्रमाणे ती बोट लाटांवर हेलकावे खाऊ लागली, मुले किंचाळू लागली, स्त्रिया घाबरल्या, डोक्यावर टांगलेली मृत्यूची भयानक तलवार पाहून सारे हवालदील झाले. कोणी देवाला हाका मारू लागले, तर कुणी प्रार्थना करू लागले. बोटीवर एकच हलकल्लोळ निर्माण झाला !

त्या बोटीत एक युरोपियन पति-पत्नी प्रवास करीत होती. पत्नी बिचारी साफ भेदरलेली दिसत होती, परंतु पतिदेव मात्र बोटीच्या कठड्याजवळ उभे राहून सागराचे तांडव–नृत्य शांतपणे पाहात होते

"आपली बोट आता अगदी बुडायला आली आहे. काही कळत नाही का ? असे निश्चिन्त काय राहिलात ? यावर काही उपाय तरी शोधा—" पत्नी व्याकुळ होऊन पतिदेवाला म्हणाली.

पती हसला. काहीही उत्तर न देता त्याने आपल्या खिशातील पिस्तुल काढले व आपल्या पत्नीवर ते रोखून पिस्तुलाच्या चापावर बोटही ठेवले !

पत्नी चिडली. "तुमचं हे खेळणं तुमच्याच खिशात राहू द्या महाशय ! ही काय थट्टा करण्याची वेळ आहे ? सर्वांचे प्राण जायची वेळ आलेली आहे. आणि तुम्हाला मात्र छान थट्टा सुचत आहे." पत्नी थोड्याशा रागाने म्हणाली.

"ते राहू दे....परंतु माझ्या हातात हे जे भरलेलं पिस्तूल आहे त्याची भीती नाही वाटत तुला ?" पतीने तिला विचारले.

"पिस्तूल भरलेलं असो की रिकामं असो, जोपर्यंत ते तुमच्या हातात आहे तोपर्यंत मला भीती कसली ? तुमचं माझ्यावर इतके प्रेम आहे की माझ्यावर गोळी झाडणं तुम्हाला कधी तरी शक्य होईल का ?" पत्नी सहजपणे म्हणाली.

"बस्....बस्. तुला जसं ह्या पिस्तुलाबद्दल वाटतं ना? तसंच मला ह्या तुफानाकडे पाहून वाटतं. माझ्यावर खूप-खूप प्रेम करणाऱ्या, माझ्या प्रियतम ईश्वराच्या हातात जोपर्यंत हे तुफान आहे तोपर्यंत मला भीती कशाला वाटायला हवी?

"माझ्या बाबतीत बोलायचं म्हणजे कदाचित मी तुझ्यावर रागावेन व माझ्या हातून कदाचित चुकाही घडतील, परंतु ईश्वराच्या मनात मात्र माझ्याविषयी कधी राग येणार नाही की त्याच्याकडून चूकही घडणार नाही!" पतिदेव ठामपणे म्हणाले, "प्रेममय, करुणासागर ईश्वराच्या इतक्या जवळ आपण असताना एवढ्याशा तुफानाला कशाला घाबरायला हवं?"

卐 卐 卐

## २० ॐ ॐ आज सीता महाराणी ॐ ॐ कुठे दिसत नाहीत?

ईश्वर-भक्तीत अभिमानाला स्थान नाही! भक्ताचा अभिमान दूर करणे भगवंताला आवडते. भक्ताचा अभिमान हाच जणू त्याचा आहार आहे.

श्रीकृष्ण द्वारकेत असते वेळी घडलेला हा प्रसंग. श्रीकृष्णाची एक पट्टराणी सत्यभामा हिला स्वतःच्या सौंदर्याचा अतिशय अभिमान होता. आपल्याइतके सुंदर जगात कुणीच नाही असे तिला वाटे. द्वारका नगरीचे अहोरात्र रक्षण करण्याचे काम 'सुदर्शन चक्र' करी. आपल्या इतके प्रतापशाली कुणीच नाही असे चक्राला वाटे; आणि श्रीकृष्णाचा सेवक गरुड—त्याला स्वतःला वेगाचा, बलाचा खूप अभिमान झालेला होता.

एके दिवशी श्रीकृष्णांनी गरुडाला जवळ बोलाविले आणि सांगितले, "मन्दराचल पर्वतावर हनुमानजी बसले आहेत, त्यांना मी बोलावलं आहे म्हणून सांग."

गरुड वेगाने मंदराचलावर गेला व द्वारकानाथांनी (श्रीकृष्णांनी) बोलाविल्याचा निरोप त्याने हनुमंतांना सांगितला.

हनुमान परमभक्त होते. यात काही तरी ईश्वरी लीला आहे, हे त्यांनी ओळखले. त्यांनी गरुडाजवळ परत निरोप दिला. 'मी अयोध्यानाथांचा (श्रीरामाचा) सेवक आहे. द्वारकानाथांकडे कशाला येऊ?'

गरुडाजवळ हनुमंतांनी दिलेले उत्तर ऐकून श्रीकृष्ण हसले. "ठीक आहे. हनुमंतांना सांग, तुम्हाला अयोध्यानाथांनीच द्वारकेला बोलावलं आहे म्हणून", असा उलट निरोप देऊन त्यांनी गरुडाला पुन्हा हनुमंतांकडे पाठविले.

गरुड गेल्यानंतर श्रीकृष्ण सत्यभामेला म्हणाले, 'आज मी राम-भक्त हनुमानजींना आपल्याकडे बोलावलं आहे. त्यांच्यासाठी म्हणून मी धनुष्य-बाण घेऊन, मुकुट बदलून 'श्रीराम' होऊ शकेन. परंतु श्रीजानकीची जागा कोण घेणार? तेवढं अलौकिक सौंदर्य कुठून मिळणार?'

'तुम्ही काही काळजी करू नका' सत्यभामा गर्वाने म्हणाली, 'मी सीता-माईचा वेष धारण करते. माझ्यापेक्षा त्या अधिक सुंदर असणे शक्यच नाही!'

झाले, श्रीकृष्ण कोदण्डधारी रामचंद्राचा वेष धारण करून सिंहासनावर विराजमान झाले व सत्यभामाही वेष बदलून शेजारी बसली.

इकडे गरुडाने हनुमंतांना श्रीकृष्णांचा निरोप सांगितला व त्यांना लौकर निघण्याची विनंती केली.

'तू हो पुढे, हा मी तुला वाटेत गाठतो', हनुमान गरुडाला म्हणाले.

'तुम्ही मला वाटेत गाठणार?' गरुड अभिमानाने म्हणाला, 'बऱ्या बोलाने माझ्या पाठीवर बसून चला नाही तर तुम्हांला धरून न्यावे लागेल—'

गरुडाचे शब्द पुरे होतात न होतात तोच महाप्रतापी हनुमंतांनी त्याला असे भिरकावले की तो शेकडो योजने दूर समुद्रात जाऊन पडला!

मनोवेगाने हनुमान द्वारकेजवळ पोहोचले तोच सुदर्शन चक्र आडवे आले. 'माझ्या परवानगीशिवाय कोणीही आत प्रवेश करू शकत नाही'—चक्राचे शब्द पुरते बाहेर पडण्यापूर्वीच हनुमंतांनी त्याला उचलून आपल्या तोंडात टाकले व दुसऱ्या क्षणी त्यांनी महालात प्रवेश करून श्रीरामाचा वेष धारण केलेल्या श्रीकृष्णांच्या चरणकमलांवर आपले मस्तक ठेवले. सत्यभामेकडे त्यांनी पाहिलेही नाही!

भगवंतांनी हनुमानजींना विचारले, 'हनुमंता, तुझे गाल असे फुगलेले का रे?'

हनुमानजींना लगेच आठवले. आपल्या तोंडातील चक्र बाहेर काढून ते म्हणाले, 'हे चक्र वाटेत आडवं आलं भगवान, म्हणून असं तोंडात धरून ठेवावं लागलं.'

‘आणि तुला आणायला कुणी गेलं होतं ना ?’ भगवंतांनी पुन्हा प्रश्न केला.

‘तो पक्षी तर अगदी मंदगती होता महाराज. आता येऊन पोहोचेल कदाचित’, हनुमान म्हणाले. तेवढ्यात पाण्यात भिजून चिंब झालेला गरुड धापा टाकीत तेथे आला. हनुमंताचे शब्द ऐकून त्याची मान खाली झाली !

आता हनुमानजींना थोडा धीर आला. ते हात जोडून भगवंताला म्हणाले, ‘आपण त्रिभुवन-सुंदर, सर्व-समर्थ आहात महाराज. क्षमा करा. आज श्रीसीता महाराणी कुठे दिसत नाहीत त्या ? आणि महाराणींच्या जागेवर भगवंतांनी कृपाळूपणे ह्या कुणा साध्या दासीला बसायची परवानगी दिली आहे वाटतं ?’

हनुमानजींचे हे शब्द ऐकताच सत्यभामेच्या सौंदर्याचा अभिमान पार विरला. ती निमूटपणे उठली व लाजेने तिथून निघून गेली !

卐 卐 卐

# २१ ॐ ॐ ॐ ॐ दुःखी होण्याचे कारण तरी काय ?

श्रीउडिया बाबाजी महाराज नावाचे अत्युच्च कोटीचे आत्मज्ञानी महात्मा उत्तर हिंदुस्थानात होऊन गेले. अनेक भक्त, जिज्ञासू महाराजजींच्या दर्शनाला येत. त्यांना ईश्वरासंबंधी, तत्त्वज्ञान व जीवनासंबंधी अनेक प्रश्न विचारीत. महाराजजी त्यांना अचूक, मर्मग्राही उत्तरे देऊन चकित करीत.

श्रीउडिया बाबाजींकडे एक मोठे श्रीमंत गृहस्थ वरचेवर येत. त्यांचे नेहमीचे एक रडगाणे असे, “महाराज, घरात पैसे पुरत नाहीत हो. माझं उत्पन्न वाढेल अशी काही कृपा करा,” असे त्यांचे रोजचे म्हणणे असे.

श्रीउडिया बाबाजींनी ह्या श्रीमंत भक्ताला एक दृष्टान्त सांगितला होता—

थंडीचे दिवस होते. एक भिकारी रात्रीच्या वेळी अंगावर अपुरी घोंगडी पांघरून उघड्यावर निजला होता. थंडीने विव्हळत होता! शेजारून एक महात्मा चालले होते. संत-हृदय नेहमी कनवाळू असते. त्या महात्म्यांनी भिकाऱ्याला विचारले,

“का रे बाबा असा विव्हळतोस ?”

"माझी घोंगडी अपुरी आहे स्वामीजी," तो भिकारी म्हणाला, "डोकं झाकायला गेलो तर पाय थंडीने कुडकुडायला लागतात व पाय झाकले तर डोकं थंडीत बधिर व्हायला लागतं ! थंडीने मी पुरा बेजार झालो आहे महाराज."

यावर महात्मा त्या भिकाऱ्याला म्हणाले, "भल्या माणसा, ज्यांच्याजवळ पांघरायला फाटकं तुटकं वस्त्रही नाही अशी तुझ्यापेक्षा कितीतरी गरीब माणसं या जगात आहेत. या कडाक्याच्या थंडीत त्यांचा निभाव कसा लागत असेल याचा थोडा तरी विचार कर. वेड्या, ह्या तुझ्या घोंगडीची लांबी आता थोडीच वाढणार आहे ? तू मात्र जर आपले हातपाय पोटात घेऊन निजशील तर हीच घोंगडी तुला पुरेशी होईल बघ !"

हा दृष्टान्त सांगून श्रीउडिया बाबाजी महाराज त्या श्रीमंत गृहस्थाला म्हणाले, "तुमच्याजवळ किती तरी मोटारी, घोडागाड्या पडलेल्या आहेत; अनावश्यक असे नोकर-चाकर किती, आणि हे तुमचं घर तरी किती मोठं ! तुम्ही तुमचा खर्च कमी का नाही करीत ? बाहेरील झकपक, खोटी शोभा व खोट्या प्रतिष्ठेच्या भ्रमाला बळी पडून मनातल्या मनात कुढत का राहता ? आपल्या अंतरात्म्याला का दुःख देता ? आज तुमच्याकडे लाखावर संपत्ती व हजारो रुपयांचं उत्पन्न आहे तर मग तुम्हाला दुःखी होण्याचं कारण तरी काय ?"

मनाच्या अधिकाधिक लोभाने तडफडणारी जी माणसे आपल्याला आढळतात अशांना किती करारी व मर्मभेदक असा हा उपदेश आहे !

卐 卐 卐

## २२ ॐ ॐ ॐ ॐ हा चाकू मला थोडीच इजा करणार आहे ?

परस्परावरील विश्वास म्हणजे अंतःकरणातील प्रकट होणारे पावित्र्य होय. घरात सुख–शांती हवी असेल तर प्रथम विश्वास येऊ द्या. पति–पत्नी, भाऊ–बहीण, गुरु–शिष्य, माता–पुत्र किंवा पिता–पुत्र ही व इतर अनेक नाती विश्वासावर उभी आहेत. विश्वासातून प्रेम निर्माण होते. दृढविश्वासामुळेच भक्ती साध्य होत असते.

दोन जिवलग जुने मित्र एकदा दाट जंगलातून चालले होते. वाटेत रात्र पडली. त्यांना जंगलातच मुक्काम करावा लागला. त्या जंगलात हिंस्र श्वापदांचे मोठे भय होते तेव्हा आळीपाळीने एकाने निजावे व दुसऱ्याने पहारा करावा असे ठरले.

याप्रमाणे एक मित्र झोपलेला असता एक मोठा विषारी सर्प फुस–फुस करीत आला व त्या झोपलेल्या मित्राच्या अंगावर धावून जाऊ लागला. पहारा करणाऱ्या मित्राने त्याला हटकले.

'खबरदार, माझ्या या मित्राला का दंश करतोस?' त्याने दटावून विचारले.

तो सर्प मनुष्यवाणीने बोलू लागला, 'तुझ्या मित्राने मागे मला जखम करून माझं रक्त सांडलं आहे. त्याचं रक्त चाखायला मिळेल तेव्हाच मी शांत होईन!'

'तुला माझ्या मित्राचे प्राण हवेत की रक्त?'

'मला त्याचे प्राण नकोत, मला हवं आहे फक्त रक्त. मला त्याचा सूड घ्यायचा आहे!' सर्पाने उत्तर दिले.

'इतकंच ना?' असे म्हणून तो पहारा करणारा मित्र खाली वाकला व आपल्या खिशातील तीक्ष्ण धारदार चाकू उघडून त्याने झोपलेल्या मित्राच्या गळ्यावर ठेवला. चाकूच्या स्पर्शाबरोबर त्या निजलेल्या मित्राने डोळे उघडले, परंतु चाकू हातात धरलेल्या आपल्या मित्राकडे पाहून तो किंचित हसला व पुन्हा लगेच झोपी गेला. चाकूवर आलेले रक्त पिऊन तो सर्प समाधानाने निघून गेला!

उजाडल्यावर त्या पहारा करणाऱ्या मित्राने दुसऱ्याला विचारले, 'तुझ्या गळयावर रात्री मी चाकू लावला होता, तेव्हा तुला काय वाटलं रे?'

दुसरा मित्र म्हणाला, "खरं सांगू? जेव्हा मी डोळे उघडले व गळ्यावर ठेवलेला चाकू पाहिला तेव्हा सुरुवातीला मला भीतीच वाटली! पण नंतर मनात आलं,—हा चाकू जोपर्यंत तुझ्या हातात आहे तोपर्यंत भीती कसली? उलट यामागे माझं कल्याणच दडलं असलं पाहिजे.—हा विचार जेव्हा माझ्या मनात आला तेव्हा माझं मलाच हसू आलं आणि मी पुनरपि शांत झोपी गेलो.'

卐 卐 卐

# २३ ॐ ॐ ॐ ॐ सद्भावाचे बळ

जीवनात जर खरे सुख–समाधान हवे असेल तर परस्परांविषयी सद्भाव—चांगली भावना—असणे अत्यंत आवश्यक आहे. तुम्ही जर जगाविषयी सद्भाव बाळगलात तर तुमच्याविषयी जग सद्भाव बाळगील, हा साधा सरळ नियम आहे.

एका नगरीत एक राजा होता. दर दिवशी महाराजांची स्वारी नगराचा फेरफटका करायला बाहेर पडे. राजमार्गावर चंदनाच्या लाकडाचे मोठे दुकान होते. त्या वखारीचा मालक दुकानाच्या गल्ल्यावर बसलेला असे. राजाची स्वारी दिसली की तो राजाला लवून मुजरा करी.

—पण का कुणास ठाऊक, त्या मालकाला पाहिले की राजाच्या कपाळावर आठ्या पसरत. या गृहस्थाला अगदी लगोलग फासावर द्यायला हवे असा क्रूर विचार नकळत राजाच्या मनात येई! राजाला अर्थात याचे फार आश्चर्य वाटे. दर वेळेला हा प्रकार घडून येई.

शेवटी राजाला हे अगदी असह्य झाले. या गोष्टीचा एकदा सोक्षमोक्ष करून घ्यायला हवा, म्हणून त्याने त्या वखारीच्या मालकाला राजवाड्यात बोलाविले व आपल्या मनाची विनाकारण चाललेली घालमेल त्याच्या कानावर घातली.

राजा म्हणाला, "भल्या गृहस्था, तू माझा किंवा कुणाचा अपराध कधी काही केला नाहीस, मग माझ्या मनात तुला पाहताक्षणीच फाशी देण्याची इच्छा का व्हावी?"

काही वेळ तो वखारीचा मालक काही बोलला नाही. त्याचे थरथरणारे ओठ पाहून राजा पुन्हा म्हणाला, "तुला जे काही वाटतं ते बेलाशक बोल, तुला मी अभय दिलं आहे."

चंदनाच्या वखारीचा तो मालक म्हणाला, "क्षमा करा महाराज, तुम्हाला ठाऊकच आहे की माझ्या मालकीची चंदनाची वखार आहे. जेव्हा जेव्हा तुम्ही माझ्या दुकानासमोरून जाता तेव्हा माझ्या मनात एकच दुष्ट विचार नेहमी येत असतो की राजेसाहेबांना लौकर मरण येईल तर बरं, कारण त्या निमित्ताने माझी चंदनाची लाकडं तरी भरपूर खपतील!"

आपला एखादा हितशत्रू आहे हे जर आपल्याला कळले व दररोज रात्री निजण्यापूर्वी आपण त्याचे मनापासून प्रेमपूर्वक जर शुभचिंतन केले, तर त्याच्या मनातील दुष्टावाही मावळू शकतो.

卐 卐 卐

## २४ ॐ ॐ दुःखातून सुख ॐ ॐ निर्माण करण्याची कला

ऊन-सावलीप्रमाणे जीवनात सुख-दुःखाचा खेळ सतत चालू असतो. सुखातून निर्माण होणाऱ्या हर्षामुळे किंवा दुःखातून निर्माण होणाऱ्या उद्वेगामुळे मनाचा समतोलपणा बिघडतो. दुःखातून आनंद निर्माण करण्याची कला संतांना साधलेली असते. अशाच एक वंदनीय महापुरुषाच्या जीवनात घडलेली ही सत्यकथा आहे—

उत्तरप्रदेशात श्रीहरिबाबा नावाचे थोर साक्षात्कारी संत अगदी अलीकडे होऊन गेले. श्रीहरिबाबा म्हणजे चालते-बोलते परब्रह्म होते. त्यांची ऋजुता, विनम्रता, ईश्वरभक्ती केवळ अपूर्व होती. अगदी वृद्धावस्थेत, अलीकडे अवघ्या ३–३॥ वर्षांपूर्वी त्यांनी इहलोकाचा निरोप घेतला.

बहुतेक श्रीवृन्दावनच्या आसपास घडलेला हा प्रसंग आहे. एकदा श्रीहरिबाबांना त्यांच्या एका भक्ताने मोठ्या आदराने आपल्या घरी जेवणाचे निमंत्रण दिले होते. सारा स्वयंपाक त्याने स्वतः केला होता, परंतु गडबडीत एक मोठी चूक झाली. भाजीत व आमटीत नेहमीच्या तेलाच्या ऐवजी एरंडेल तेल नकळत टाकले होते !!

श्रीहरिबाबांनी जेव्हा जेवायला सुरुवात केली तेव्हा त्यांच्या लक्षात ही गोष्ट आली. तो भक्त समोर उभा राहून प्रेमादराने जेवण वाढीत होता. आपले जेवण आटोपल्यावर हा भक्त स्वतः जेवायला बसेल व ही चूक लक्षात आल्यावर त्याला केवढे मरणप्राय दुःख होईल याची कल्पना त्या महापुरुषाच्या मनात आली आणि लगोलग त्यांना एक अजब युक्ती सुचली—

"भल्या गृहस्था, जेवण तर काय नामी केलं आहेस—" श्रीहरिबाबा संतोषपूर्वक म्हणाले.

"हो ना? जेवण करायचा मला चांगलाच सराव आहे महाराज." भक्त आनंदाने उल्हसित होऊन म्हणाला.

"ही भाजी–आमटी भरपूर केली आहेस ना? मी आज अगदी पोटभर जेवणार बरं," श्रीहरिबाबा म्हणाले.

"हो, हो, जेवा ना महाराज. तुमच्यासाठी तर सारं केलं आहे," गुरुमाऊलीची कृपा पाहून भक्ताचा चेहरा आनंदाने ओसंडत होता.

—आणि नंतर श्रीहरिबाबांनी ती एरंडेल तेल पडलेली भाजी व आमटी एकट्याने संपूर्ण संपविली. त्या भक्तासाठी एक कणही शिल्लक ठेवला नाही! भक्ताला अगदी कृतकृत्य वाटले. जेवणात एरंडेल वापरले गेल्याचे त्याला कळूच शकले नाही!

श्रीहरिबाबा आश्रमात आल्यावर त्या एरंडेल तेलाचा व्हायचा तो परिणाम सुरू झाला! एक-दोन दिवस सारे कष्ट त्यांनी आनंदाने सहन केले. परंतु हे 'त्या' जेवणामुळे होत आहेत याची पुसट कल्पनाही त्यांनी त्या भक्ताला येऊ दिली नाही.

पुढे कुणीतरी त्यांना या संदर्भात विचारले असता श्रीहरिबाबा म्हणाले, "त्यात नवल काय आहे? पोट साफ होण्यासाठी एरंडेल केव्हा तरी घेतातच. मी आपलं ते त्याच दिवशी घ्यायचं ठरविलं, दुसरं काय?"

संतांना ईश्वराप्रमाणे "करुणाघन" म्हणून संबोधितात, ते काही उगाच नव्हे!

卐 卐 卐

# २५ ॐ ॐ महाप्रभू चैतन्यांची ॐ ॐ मूळाक्षरे

प्रश्न किंवा जिज्ञासा हे ज्ञान-प्राप्तीचे महत्त्वाचे साधन आहे. सर्वांच्या मनात लहानपणापासून प्रश्न उत्पन्न होत असतात. आपण त्यांची उत्तरे आपापल्या परीने शोधतो व यातूनच मनाची, बुद्धीची वाढ होत असते. मात्र प्रश्ना-प्रश्नातही फरक असतो! असामान्य व्यक्तींच्या जीवनात लहानपणी निर्माण होणारे प्रश्नही तसेच असामान्य असतात.

भारतातील एक श्रेष्ठतम कोटीचे कृष्ण-भक्त म्हणून बंगालच्या महाप्रभू चैतन्यदेवांचे नाव तुम्ही ऐकले असेल. चैतन्य लहानपणी आपल्या गुरुजींजवळ मूळाक्षरे गिरवीत असताना घडलेला हा प्रसंग आहे—

गुरुजींनी चैतन्यांना 'क-ख-ग-घ' ही मूळाक्षरे शिकवायला सुरुवात केली व त्यांपैकी 'क' हे अक्षर छानपैकी घोकून-गिरवून घेतले. 'क' नंतर 'ख'ची पाळी आली! तोच चैतन्य प्रभूंच्या बालमनात एक प्रश्न उभा राहिला—

त्यांनी गुरुजींना विचारले, "'क' नंतर 'ख' का हो? 'क' च्या अगोदर 'ख' का येत नाही? आणि 'क' नंतर 'ख' च का यावा, दुसरं कुठलं अक्षर का नाही?"

या विद्यार्थ्याची समजूत कशी घालावी हे गुरुजींना कळेना! आणि चैतन्य तर या प्रश्नाचे उत्तर मिळाल्याशिवाय पुढील अक्षरे शिकायला तयार होईनात!

शेवटी गावातील एका संताकडे ही समस्या नेण्यात आली. बाल-चैतन्याने त्यांच्यासमोर आपली बाजू मांडली. त्या महात्म्याने चैतन्यदेवांची अडचण व त्यांचे अंतःकरण जाणले. त्यांनी 'क–ख–ग–घ' ही मूळाक्षरे ओळीने लिहिली व म्हटले—

"बघ बेटा, हा पहिल्यांदा '**क**' आहे. '**क**' चा अर्थ "**करना.**" जीवनात खूप काम कर, परिश्रम कर.

नंतर '**ख**' येतो. '**ख**' म्हणजे "**खाना.**" परिश्रम केल्यावर तुला खाण्याचा अधिकार मिळेल.

नंतर '**ग**' येतो. '**ग**' म्हणजे "**गमन करना.**" देशात खूप परिभ्रमण कर, फीर, जीवनाचा अनुभव घे.

आणि नंतर '**घ**' म्हणजे "**घर करना**". परिश्रम केलेस, अनुभव घेतलास की तुझ्या आवडीप्रमाणे घर उभं कर, जीवनात स्थिर होऊन जा.

चैतन्य महाप्रभूंना हा अर्थ लगोलग पटला. त्यांनी त्या महात्म्याला वंदन केले व पुढील अक्षरे ते भराभर शिकू लागले.

卐 卐 卐

# २६ ॐ ॐ ॐ ॐ श्रीराधाराणीचा मोर

श्रीवृन्दावन ही प्रेम-भक्तीची अमर भूमी आहे. भगवान् श्रीकृष्णाची बासरी इथे घुमली. नंद-यशोदा, गोप-गोपी, अक्रूर-उद्धव यांसारख्या कितीतरी कृष्ण-भक्तांच्या स्मृती वृन्दावनाच्या अणुरेणूंत एकरूप झाल्या आहेत. इथली झाडे-वेली, पशु-पक्षीही श्रीकृष्णमय आहेत. श्रीकृष्णाच्या स्पर्शाने बहरलेली यमुना नदी आणि रोमांचित झालेला गोवर्धन पर्वत अजून आपणास दर्शन देत आहेत.

पूर्ण श्रद्धा-भक्तीने वृन्दावनात वावरणाऱ्याला ह्या पवित्र भूमीत तर्का-पलीकडील कितीतरी गोष्टींचा अनुभव येत असतो. अशांपैकीच ही एक सत्यकथा.

वृन्दावनात अलीकडे एक मोठे कृष्णभक्त राहात होते. लोक त्यांना 'साई' म्हणत. (साई हे आदरार्थी संबोधन भक्ताला उद्देशून वापरले जाते.) ईश्वराचे नाम घेत साईजी कुठेही विचरण करीत. एके दिवशी त्यांनी वृंदावनापासून ८–१० मैलांवर असलेल्या बरसाणा गावी जाण्याचा विचार केला.

'बरसाणा' म्हणजे श्रीकृष्णाची असामान्य भक्त श्रीराधाराणी हिचा गाव. बरसाण्याला घनदाट जंगल, मोठमोठी प्रशांत सरोवरे आहेत. वृंदावनात आढळणारे मोर बरसाण्यात खूप आहेत. मोर हा राधाराणीचा आवडता पक्षी, म्हणून तर श्रीकृष्ण मयूर-पिसे आदराने आपल्या मस्तकावर धारण करीत.

साईजी मनात आल्यावर एकटेच वृन्दावनहून निघाले व बरसाण्याच्या जंगलात मनमुराद भटकले. एवढ्यात सायंकाळ झाली. पण त्यांना त्या जंगलातून बाहेर पडण्याचा रस्ता सापडेना! हळुहळू रात्र झाली. परंतु साईजींच्या मनाला भीतीचा स्पर्शही झाला नाही. ते त्या जंगलात झाडाखाली बसले व आनंदाने भजन करू लागले.

—तितक्यात त्या अंधारातून एक मोर अचानक फडफड करीत तिथे आला व साईजींच्या समोर डौलाने फिरू लागला. साईजी उभे राहिले व त्या मोराच्या मागोमाग चालू लागले. बराच वेळ गेला....साईजींनी आजूबाजूला पाहिले तो त्यांना मोरा– मागोमाग आपण नीट गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर आल्याचे आढळले. मोर लगेच पंखांची फडफड करीत जंगलाकडे उडत गेला!

卐 卐 卐

# २७ ॐ ॐ ॐ ॐ एक पैसा सुद्धा सबंध राज्य जाळू शकेल !

मनुष्य–शरीराच्या वाढीसाठी चांगल्या आहाराची आवश्यकता असते. आपले अन्न जसे ताजे, उत्तम शिजविलेले व पौष्टिक असावे तसे ते शुद्ध व पवित्रही असायला हवे. शरीराची व मनाची वाढ उत्तम आहारावर अवलंबून असते.

मानवी जीवनात अन्नाप्रमाणे पैशालाही महत्त्व आहे. भारतीय संस्कृतीत 'अर्थ' हा एक पुरुषार्थ मानला जातो. घरात येणाऱ्या पैशावर, संपत्तीवर कुटुंबाचे भरण–पोषण होत असते व सर्व व्यवहार चालत असतात. हा घरात येणारा पैसाही आहाराप्रमाणे शुद्ध व पवित्र असायला हवा. एखाद्यावर अन्याय करून, त्याला फसवून, वाईट मार्गाने घरात येणारा पैसा खरे सुख, समाधान किंवा शांती निर्माण करू शकत नाही. उलट, अशा पैशाबरोबर कलह व इतर अनर्थ निर्माण होतात. मोठमोठे काही कोट्याधीश एक तासभर कधी निश्चित व सुखाने झोपू शकत नाहीत, ही सत्यस्थिती होय !

एक राजा होता. एके दिवशी मध्यरात्री त्याला अचानक जाग आली. त्याने खिडकीतून पाहिले तो आपल्या खजिन्यातून उजेड येताना त्याला दिसला व तिथे कुणी वावरत आहे असा त्याला भास झाला. ह्या मध्यरात्रीच्या वेळी खजिन्यात कोण काय करीत असावे, या शंकेने त्याने आपली पावले हलकेच खजिन्याकडे वळविली.

खजिन्यात त्याचे विश्वासू प्रधानजी बसले होते. ते पुन्हा पुन्हा पैसे मोजीत होते, हिशेब तपाशीत होते. त्यांच्या चेहऱ्यावर चिंता पसरलेली राजाला दिसली !

राजाला मोठे आश्चर्य वाटले व त्याने विचारले, "का प्रधानजी, अजून हिशेब जमला नाही वाटतं ? आजच्या हिशेबात काही तूट पडली का ?"

"छे, छे, महाराज, तूट नाही पडलेली," प्रधानजी लगबगीने उभे राहात, हात जोडीत म्हणाले, "उलट हिशेबापेक्षा जमा झालेली रक्कम थोडी अधिकच आहे !"

"रक्कम वाढलेली आहे ना ? मग एवढ्या चिंतेचे कारण काय ?" राजाने आश्चर्याने विचारले.

"रक्कम वाढलेली आहे, म्हणूनच चिंता वाटते महाराज," प्रधानजी अदबीने म्हणाले. "ही वाढीव रक्कम कदाचित कुणा गरीबाकडून चुकीने जमा झाली असेल, नजरचुकीने कुणावर अन्याय होऊन, कुणाकडून जादा दंड वसूल होऊन ही रक्कम वाढली असेल! म्हणून पुन्हा पुन्हा मी हिशेब तपाशीत आहे—एखाद्या गरीबावर अन्याय होऊन जमा झालेला एक पैसासुद्धा सबंध राज्य जाळू शकेल, महाराज!"

卐 卐 卐

## २८ ॐ ॐ ॐ ॐ अढळ सुख व ऐश्वर्य हवे असेल तर—

महाभारताच्या शांतिपर्वात महात्मा भीष्माचार्यांनी प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णांच्या सान्निध्यात, धर्मराजाला जीवनदायी मधुर उपदेश केलेला आहे. जीवनाच्या अंतिम अवस्थेत शरशय्येवरून केलेल्या ह्या उपदेशात उत्तम चारित्र्याचे महत्त्व विशद करणारी एक सुंदर कथा भीष्मपितामहांनी सांगितली आहे—

बालभक्त प्रल्हादाची कथा बहुतेकांना ठाऊक आहे. हिरण्यकश्यपूच्या मृत्यूनंतर प्रल्हाद राजा झाला. अत्यंत चारित्र्यसंपन्न, दयाशील व सत्यप्रिय राजा म्हणून प्रल्हादाची कीर्ती त्रिलोकात पसरली व त्रिलोकीचे राज्यही त्याला मिळाले.

आपले राज्य गेल्यामुळे स्वर्गलोकातील इंद्राला मोठी चिंता पडली व तो देवगुरू बृहस्पतीजवळ मार्गदर्शनासाठी गेला. परंतु बृहस्पतींनी सुचविलेल्या उपायाने त्याचे समाधान होईना, म्हणून तो शुक्राचार्यांजवळ गेला व आश्चर्य असे की शुक्राचार्यांनी त्याला खुद्द राजा प्रल्हादाकडेच जायला सांगितले.

एका गरीब ब्राह्मणाचा वेष धारण करून इंद्र प्रल्हादाकडे आला व 'महाराज, मला ऐश्वर्यप्राप्तीचा मार्ग दाखवा' त्याने प्रल्हादाला विनंती केली.

'मी सध्या राज्यकारभारात गुंतलो आहे. मला उपदेश करायला सवड नाही,' प्रल्हादाने सांगितले.

'ठीक आहे. मी इथे तुमची सेवा करीत राहीन. तुम्हाला सवड मिळेल तेव्हा उपदेश करा', इंद्र नम्रतेने म्हणाला. प्रल्हादाने त्याला संमती दिली.

यानंतर काही दिवस गेले. एके दिवशी ब्राह्मणवेषधारी इंद्राने प्रल्हादाला विचारले, 'हे त्रिलोकीचे राज्य तुम्ही कसं मिळविलंत, महाराज ?'

'मला राजेपणाचा अभिमान नाही', प्रल्हाद सांगू लागला, 'मी ब्राह्मण–देवतांचा आदर करतो. माझं चारित्र्य, सेवा पाहून ते संतुष्ट होतात व मला वेळोवेळी उपदेश करीत असतात.'

नंतर प्रल्हाद त्या वेषधारी इंद्राला म्हणाला, 'तू जी माझी सेवा केलीस त्यामुळे मी प्रसन्न झालो आहे. तुझी इच्छा असेल तो वर माग.'

'मला दुसरं काही नको महाराज' इंद्र नम्रतेने म्हणाला, 'जर तुम्ही वर देणार असाल, तर तुमचं **उत्तम चारित्र्य** तेवढं मला द्या.'

राजा प्रल्हादाने त्या ब्राह्मणवेषधारी इंद्राची विनंती मान्य केली व आपले सच्चारित्र्य त्याला अर्पण केले.

याच वेळी प्रल्हादाच्या शरीरातून एक छायाकृती बाहेर पडली. 'कोण आहेस तू ?' प्रल्हादाने तिला विचारले.

'तुम्ही ज्याचं नुकतंच दान केलंत ते मी तुमचं चारित्र्य-शील आहे. मी यापुढे या ब्राह्मणाच्या शरीरात राहीन.' त्या छायेच्या पाठोपाठ प्रल्हादाच्या शरीरातून धर्म, सत्य, बळ व लक्ष्मी (वैभव) सुद्धा क्रमाक्रमाने बाहेर पडली व आपापली ओळख पटवून देऊन त्यांनी प्रल्हादाचा निरोप घेतला. कारण जिथे उत्तम चारित्र्य असते तिथेच हे सद्‌गुण राहात असतात.

सच्चारित्र्य म्हणजे काय ? आपल्या मनाने, वाणीने व आचरणाने कुणाचे अनिष्ट न करणे, सर्वांवर दया करणे व दान करणे हेच उत्तम चारित्र्य होय. ज्यापासून कुणाचे अहित होत असेल व ज्यामुळे समाजात आपली मान खाली होत असेल, असे काम आपल्या हातून कधी घडता कामा नये. ज्यांचे चारित्र्य बिघडलेले आहे त्याला कधी ऐश्वर्य मिळत नाही व मिळाले तर ते कधी टिकत नाही! ज्याला अढळ सुख व संपत्ती हवी असेल त्याने उत्तम चारित्र्य संपादन करायला हवे.

卐 卐 卐

# २९ ॐ ॐ ॐ ॐ प्रियतय प्रभूचा संकल्प

उत्तर हिंदुस्थानात श्रीहरिबाबाजी नावाचे थोर साक्षात्कारी महात्मा अलीकडे होऊन गेले. त्यांच्या अंतःकरणात अपार गुरुनिष्ठा व ईश्वरभक्ती होती. ईश्वराशिवाय अवांतर गोष्टीची चर्चा करणे, कुणाची निंदा ऐकणे त्यांना पसंत नसे. मनाची विलक्षण एकाग्रता त्यांना साधलेली होती. सकाळ संध्याकाळी जेव्हा ते फिरायला बाहेर पडत तेव्हा जर छातीशी हात धरलेला असला तर ५ मैल फिरणे झाले तरी तो हात तसाच छातीशी राहिलेला आढळून येई! त्यांची दृष्टी अन्तर्मुख असे. शेजारून कोण आले, गेले याचे भान त्यांना नसायचे. त्यांचा स्वभाव अत्यंत मृदू, कोमल पण निश्चयी होता.

श्रीवृन्दावनात घडलेला हा प्रसंग आहे. एकदा श्रीहरिबाबाजी मला म्हणाले, "आपण इथे एका वर्षाचा संकल्प करू या. तुम्ही श्रीधरी भागवत सांगत जा, मी ऐकत जाईन."

"परंतु या भागवत अनुष्ठानाची माहिती पसरली की लांबलांबून लोक येतील. त्यांच्या जेवणा–राहण्याची सोय व्हायला हवी," मी म्हणालो.

"त्याची काळजी नको. आपण कथेला प्रारंभ करू. या. भगवान सर्व काही करतील."

एका वर्षाच्या संकल्पाने श्रीभागवत–अनुष्ठान सुरू झाले. दर दिवशी अगदी ठरलेल्या वेळेला कथा होत होती. मध्यंतरीच्या काळात मला सिलोनहून एक निमंत्रण आले. परंतु "हे निमंत्रण म्हणजे अनुष्ठानात विघ्न होय. जो संकल्प स्वीकारला आहे, तो तोडू नये." असे बावांचे मत पडले व मीही त्यांची आज्ञा मान्य केली. भागवत–कथा नियमाने ११ महिने सुरू राहिली.

शेवटच्या महिन्यात श्रीहरिबाबा मला म्हणाले, "आता सकाळ–संध्याकाळच्या वेळात उरलेली एका महिन्याची कथा १५ दिवसांतच पूर्ण करून घ्या. मला जगन्नाथपुरीला जायचं आहे."

मला थोडे आश्चर्य वाटले. "एवढा ११-११॥ महिने चाललेला संकल्प १५ दिवसांकरिता का तोडता?" मी विचारले.

श्रीहरिबाबा हसले व माझ्या पाठीवर हात ठेवून म्हणाले, "आपला संकल्प पुरा व्हावा असा आग्रह संसारी माणसं धरीत असतात. साधूंचा संकल्प पूर्ण होण्यापेक्षा तुटणं अधिक चांगलं. आपला स्वतःचा संकल्प जेव्हा अपूर्ण राहतो तेव्हाच आपल्या प्रियतम प्रभूचा संकल्प पूर्ण होत असतो."

卐 卐 卐

## ३० ॐ ॐ ॐ ॐ मनात बांधलेले सुवर्ण—मंदिर

एकदा एका शेटजीच्या मनात एक सुंदर सुवर्णमंदिर बांधण्याचा संकल्प आला. आपल्या सुवर्णमंदिरात भगवंत राहतील, सर्वांना दर्शनाचा लाभ मिळेल, असे त्यांना वाटले. श्रीमंतांचा संकल्प! तो पूर्ण व्हायला कितीसा उशीर? लगेच साधन-सामुग्री जमविली गेली, पाया खणला गेला व एकामागाहून एक सोनेरी विटा रचल्या जाऊ लागल्या.

जिथे हे बांधकाम चालले होते तिथे जवळच एक साधूची झोपडी होती. साधू विरक्त व ईश्वर—भक्त होता. त्याच्याजवळ पैसा तर मुळीच नव्हता. जसजसे शेटजींच्या मंदिराचे काम सुरू झाले तसतसे त्याने चिंतनाने आपल्या मनात मंदिर बांधण्यास सुरुवात केली. शेटजींच्या मंदिरावर सोन्याच्या विटा चढू लागल्या की तो आपल्या मनातील मंदिरात मनोमन तशाच सोनेरी विटा चढवी. अगदी हुबेहूब शेटजींच्या मंदिराप्रमाणे त्या साधूने स्वतःच्या मनात मंदिर उभारले.

मंदिर बांधून पूर्ण झाल्यावर शेटजींनी देवाची सुंदर मूर्ती आणली आणि धर्मशास्त्राच्या मोठ्या विद्वानांना निमंत्रण देऊन मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यास प्रारंभ केला.

इकडे साधूनेही आपल्या अंतःकरणातील मंदिरात ईश्वराला आवाहन केले आणि आश्चर्य असे की भगवंतांनी त्याच्या मनात प्रगट होऊन त्याची पूजा स्वीकारली. एवढेच नव्हे तर ते त्याच्याशी हसू-बोलू लागले.

शेटजींच्या सुवर्णमंदिरात विद्वान पंडितांनी सर्व अभिषेक केले, मूर्तीच्या मस्तकापासून चरणापर्यंत न्यास विधी वगैरे केले, तरीही मूर्तीत तेज प्रगट होईना! ते सर्व विद्वान ब्राह्मण शेटजींना म्हणाले, "आमच्या कर्मकांडात

कुठेच दोष राहिलेला नाही महाराज. परंतु मूर्तीत ईश्वरी तेज प्रकट का होऊ नये कळत नाही."

शेटजींना साहजिकच दुःख झाले. सर्वजण परस्पर सल्लामसलत करून एका महात्म्याजवळ गेले व सारी कथा त्यांनी सांगितली. महात्म्याने सारे ऐकून घेतले व थोडा वेळ ध्यानस्थ बसल्यावर ते म्हणाले, "या वेळी भगवान दुसऱ्या ठिकाणी गुंतलेले आहेत, म्हणून तुमच्या मूर्तीत आलेले नाहीत! तुमच्या मंदिराच्या शेजारी झोपडीत जो साधू आहे त्याने तुमच्यासारखं मंदिर आपल्या मनात बांधलेलं आहे व भगवान सध्या त्याची सेवा-पूजा स्वीकारीत आहेत. त्या साधूला जर तुम्ही तुमच्या मंदिरात बोलावलंत तर भगवान त्याला दर्शन देण्याकरिता मूर्तीत प्रवेश करतील."

सुवर्ण-मंदिर बांधण्याचा शेटजींचा अभिमान केव्हाच मावळून गेला होता! ते विद्वान ब्राह्मणांबरोबर त्या साधूच्या झोपडीवर गेले व त्यांनी साधूला मंदिरात येण्याची प्रार्थना केली.

साधुमहाराज मंदिरात आले. हिरेमाणकांनी सजविलेल्या भगवंताच्या मूर्तीवर त्यांची दृष्टी पडण्याचा अवकाश, लगेच मूर्तीत ईश्वरी तेज झळकू लागले!

भक्ताच्या हृदयातून भगवान मूर्तीत प्रवेश करीत असतात. सिद्ध महापुरुषांनी सेवा केलेल्या मूर्तीत विशेषता आलेली असते.

卐 卐 卐

# ३१ ॐ ॐ ॐ ॐ उपाशी राहाण्यातील आनंद

**यज्ञशिष्टाशिनः सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषैः।**
**भुञ्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात्।**

—श्रीमद्भगवद्गीता (अध्याय ३, श्लोक १३)

**यज्ञात उरले खाती संत ते दोष जाळिती।**
**रांधिती आपुल्यासाठी पापी ते पाप भक्षिती॥** (गीताई)

श्रीमद्-भागवत हा महान् वैष्णव-ग्रंथ आहे. परंतु यात भक्ताने गंध कसे लावावे, वस्त्र कोणते वापरावे किंवा माळा रुद्राक्षाची घालावी की तुळशीची,

याचे मुळीच वर्णन नाही. बाह्य चिन्हांवरून कोणी भक्त किंवा संत होऊ शकत नाही. अंतर्यामी ईश्वराबद्दल भक्ती बाळगून जगात सर्वत्र भगवद्-दृष्टीने जो वावरतो तो संत.

श्रीउडिया बाबाजी महाराजांची एक विशेषता होती. आश्रमात आलेल्या प्रत्येक व्यक्तीने भोजन केल्यानंतरच ते स्वतः जेवण घेत. श्रीभगवती गीतेने सांगितले आहे, "यज्ञात उरलेलं जो खातो तो संत व स्वतःसाठीच जो अन्न शिजवितो तो पापी."

आमच्या गावाशेजारी (बनारसच्या परिसरात) एक उदार सत्पुरुष राहात होते. इंग्लंडचे बादशहा पंचम जॉर्ज 'प्रिन्स ऑफ वेल्स' म्हणून जेव्हा भारतात आले होते त्यावेळी त्यांच्याशी हस्तांदोलन करण्याची संधी या गृहस्थांना मिळाली होती.

अतिथींचा सत्कार करण्याची फार मोठी तळमळ या गृहस्थांना नेहमी वाटत असे. ते दिवसभर गुडगुडी ओढीत आपल्या ओटीवर पडून राहात, परंतु परगावच्या कुणाही पाहुण्याला दारावरून रिकाम्या पोटी जाऊ देत नसत! आपली सर्व संपत्ती त्यांनी अतिथी-सत्कारात खर्च करून टाकली होती. वेळ पडल्यास घरातील भांडी वाण्याकडे गहाण टाकून ते अतिथीच्या जेवणाची व्यवस्था करीत. एकदा तर रात्रीच्या वेळी कुणी अतिथी आले असता, घरात जळण नसल्यामुळे, आपला पलंग तोडून त्या लाकडांवर त्यांनी स्वयंपाक तयार केला होता!

मी या उदार पुरुषाला एकदा विचारले, "दुसऱ्याला खायला घालून नंतर स्वतः जेवण्यात एवढा कोणता आनंद आहे?"

त्यावर ते म्हणाले—

"कुणीही अतिथी जेवल्यानंतर स्वतः जेवण्यात एवढा आनंद नाही, तर दुसऱ्याला खायला देऊन स्वतः उपाशी राहाण्यात खरा आनंद आहे. अतिथीला जेवू घातल्यानंतर स्वतःसाठी काही न उरल्यामुळे उपाशीपोटी निजताना जो आनंद मिळतो, तो आनंद अतिथीपाठोपाठ जेवतानाही मिळत नाही."।

卐 卐 卐

# ३२ ॐ ॐ जसा संग ॐ ॐ तसा रंग

**यादृशां च उपविशति यादृशां च उपसेवते ।**
**यादृग् इच्छेत् च भवितुं तादृग् भवति पूरुषः ॥**

"कोणीही मनुष्य ज्या लोकांत उठत-बसत असतो, ज्या लोकांची सेवाचाकरी करतो व ज्यांना आपले आदर्श मानतो, त्या लोकांप्रमाणे त्याचे जीवन बनत असते."

कलकत्याला राहणाऱ्या एका श्रीमंत शेटजींनी मला स्वतःच्या जीवनातील एक सत्यकथा सांगितली होती—

शेटजींकडे सुरुवातीला दहा लाख रुपयांची संपत्ती होती. तेव्हा मात्र ते अगदी सनातनी हिंदूप्रमाणे राहात असत. साबणाऐवजी मातीने हात धूत, चौरंगावर जेवण घेत. सर्व नियमांचे नीट पालन करीत.

पुढे त्यांच्याजवळची संपत्ती वाढली, तेव्हा त्यांनी क्लबमध्ये जाणे सुरू केले. क्लबमध्ये मजा करायला शेकडोजण येत. सनातन धर्माच्या संस्कारामुळे शेटजी प्रारंभी क्लबमध्ये काही खात-पीत नसत. सभोवारचे लोक त्यांच्या सोवळेपणाची थट्टा करीत. हळु हळू शेटजी घरचे जेवण स्वतःच्या भांड्यातून नेऊन क्लबमध्ये जेवू लागले!

त्यांचे मित्र हसत व म्हणत, 'एवढा खटाटोप कशाला हवा? इथे क्लबमध्येच सुकामेवा, फळे वगैरे घ्यायला काय हरकत आहे?' शेटजी मित्रांच्या आग्रहाला बळी पडले! परंतु एवढ्यावरच ही गोष्ट मर्यादित राहिली नाही. पुढे काही दिवसांनी क्लबमधील बिस्किटे, नंतर अंडी, मांस व शेवटी दारूही ते प्यायला लागले! त्यांचे सबंध जीवन वासनामय व ओंगळ बनून गेले.

एके दिवशी एकांतात ईश्वराचे भजन करीत असता एकाएकी आपले पूर्वीचे शुद्ध व पवित्र जीवन आणि हल्लीचे अशुद्ध व अपवित्र जीवन यांतील फरक त्यांच्या मनासमोर उभा राहिला. त्यांच्या मनाला मोठा क्लेश व पश्चात्ताप झाला. केवळ संगत व सहवास बदलल्यामुळे आपला हा अधःपात झाला आहे, हे त्यांनी ओळखले व त्या क्षणापासून आपले जीवन सुधारण्याचा निश्चय केला.

दृढसंकल्प व प्रयत्नांमुळे शेटजींचे जीवन पुन्हा शुद्ध झाले व आपल्या जीवनाचे अंतिम क्षण एका महात्म्याच्या आश्रमात व्यतीत करण्याचे भाग्य त्यांना लाभले.

ज्याला उत्तम जीवन जगायचे आहे, त्याने चांगली संगत निवडायला हवी. 'जैसा संग वैसा रंग', ही म्हण हिंदी भाषेत प्रसिद्ध आहेच.

卐 卐 卐

## ३२ ॐ ॐ ॐ ॐ "आम्ही अनंतकाळ आनंदाने नरकात राहू."

आपण एखाद्या फुलावर प्रेम करतो म्हणजे काय करतो ? ते फूल देठापासून तोडतो, त्याचा वास घेतो; नंतर ते फूल कोमेजून जाते किंवा आपण ते चुरगळून फेकून देतो. खरे प्रेम वेगळे असते. आपल्या आवडत्या वस्तूच्या अगर व्यक्तीच्या सुखाची काळजी ते सतत वहात असते.

श्रीकृष्ण द्वारकेत राहात त्यावेळची गोष्ट आहे. त्यावेळीही ते कृतज्ञतेने गोकुळातील गोपींचे स्मरण करीत. रुक्मिणी, सत्यभामा आदि पट्टराण्यांना हे आवडत नसे. एके दिवशी नारदमुनी श्रीकृष्णाकडे आले व म्हणाले, "भगवन, आपण गोकुळातील गोपींचा मोटेपणा वारंवार का सांगता ? तुमच्या पट्टराण्यांना तर हे कधी आवडलेलं दिसत नाही."

"तुझ्या प्रश्नाचं उत्तर मी देईन रे नारदा", भगवान श्रीकृष्ण म्हणाले, "पण आज माझ्या मस्तकात एवढ्या वेदना सुरू झालेल्या आहेत की काही सुचतच नाही—"

"का, द्वारकेत कुणी वैद्य नाहीत का ? वेदनेवर औषध—" नारदाने विचारले.

"वैद्य तर आहेत. पण त्यांनी सांगितलेलं औषध कुठे सापडत नाही," श्रीकृष्ण उद्वेगाने म्हणाले, "कुणा भक्ताची पायधूळ माझ्या मस्तकाला लागली, तर तत्क्षणी ह्या वेदना थांबतील."

"त्यात काय कठीण आहे ? मी आणतो तुमच्या भक्तांची पायधूळ," असे सांगून नारद त्वरेने महालाच्या बाहेर पडले.

नारद चोहीकडे फिरले. परंतु स्वतःची पायधुळ भगवंताच्या डोक्याला लावायला कुणीही भक्त तयार होईना! नारद जेव्हा श्रीकृष्णांच्या पट्टराण्यांजवळ यासाठी गेले तेव्हा त्या म्हणाल्या, "छे, छे, आमची पायधूळ जर श्रीकृष्णांच्या मस्तकी लावायला दिली तर आम्हाला ह्या पापाबद्दल नरकात तरी राहायला जागा मिळेल का?"

भक्ताची पायधूळ कुठेच मिळेना! निराश होऊन नारद श्रीकृष्णाजवळ आले.

"नारदा, गोकुळात गेला होतास का?" श्रीकृष्णांनी विचारले.

"त्या गावंढळ गोपी काय करणार ह्या बाबतीत?" नारद म्हणाले.

"एकदा जाऊन तर बघ," ह्या श्रीकृष्णांच्या शब्दावरून नारद वीणा वाजवीत गोकुळात आले.

गोकुळात गोपी एकत्र जमून श्रीकृष्णाची गीते गात होत्या. नारदांना पाहून त्या लगबगीने उठल्या व त्यांनी त्यांना नम्रतापूर्वक प्रणाम केला.

"मुनिवर, तुम्ही त्रिलोकात फिरला, द्वारकेत कधी गेला होता का? श्रीकृष्ण भगवान खुशाल आहेत ना?" गोपींनी एकमुखाने विचारले.

"तेच सांगायला मी आलो आहे. श्रीकृष्णाच्या मस्तकात भयंकर वेदना होत आहेत, ते अतिशय बेचैन आहेत."

"अरेरे, औषध का नाही दिलं काही? द्वारकेत कुणी वैद्य—"

"वैद्य आहेत, पण त्यांनी सांगितलेलं औषध अजून सापडत नाही," नारद म्हणाले, "कुणा भक्ताच्या पायाची धूळ लावली तर ही डोकेदुखी थांबणार आहे—"

"एवढंच?" गोपी आश्चर्याने म्हणाल्या, "ही घ्या आमची पायधूळ," असे म्हणून प्रत्येकीने आपल्या पायांनी धुळीचे ढीग जमा केले!

"गोपींनो, तुम्ही काय करीत आहात याची कल्पना आहे का? श्रीकृष्ण म्हणजे साक्षात परब्रह्म परमात्मा. तुमची पायधूळ त्यांच्या मस्तकाला लागली तर तुम्हाला नरकात जावं लागेल ना?" नारद म्हणाले.

"त्याची चिंता नको मुनिवर," गोपी नम्रपणे म्हणाल्या, "श्रीकृष्णाची डोकेदुखी जर आमच्या पायधूळीने थांबणार असेल तर आम्ही अनंतकाळ नरकात राहायला आनंदाने तयार आहोत."

卐 卐 卐

# ३४ ॐ ईश्वराची कृपा ॐ ओळखायला हवी

आई बाळाला आंघोळ घालते त्या वेळी मूल रडते, त्याला खूप कष्टही होतात. परंतु त्या आंघोळ घालण्यात आईची कृपा सामावलेली आहे. ऑपरेशन करताना चीरफाड करणारा डॉक्टरही पेशंटचे हित करीत असतो. ईश्वराचे असेच आहे. मनुष्याला शुद्ध करण्यासाठी, त्याची मलिनता नष्ट करण्यासाठी कधी कधी कष्ट, आपत्ती पाठवून ईश्वर कृपा करीत असतो. संसारातील माणसे–ईश्वराची छोटी बालके–ही कृपा ओळखू शकत नाहीत—

एकदा देशातील संतांची मोठी सभा भरली होती. सभेला उपस्थित असलेल्या महात्म्यांसाठी एका मातीच्या घटात (माठात) पवित्र गंगाजल भरून ठेवले होते. कोणीतरी सहज उद्गारला, "किती भाग्यशाली आहे हा घडा! यातील गंगाजलाने आज संतमहात्म्यांची तहान शमणार आहे. संतांची सेवा करणारा हा मातीचा घडा किती धन्य व कृतार्थ!"

त्या घड्याने हे शब्द ऐकले मात्र आणि त्याच्या मनात विचारांचे चक्र सुरू झाले—

"खरोखर, माझं जीवन इतकं भाग्यशाली असेल याची मला या क्षणापर्यंत कल्पना नव्हती! मला घडविणाऱ्या कुंभाराने जेव्हा जमिनीतून माती खोदून–खोदून बारीक पिसली तेव्हा केवढ्या वेदना झाल्या मला. मी खूप रडलो. त्या वेळी तो कुंभार केवढा निर्दय वाटत होता—

"नंतर त्याने ती माती पाण्यात भिजवली, पायाने तुडविली तेव्हा तर तो कुंभार अगदी क्रूर वाटला! मी वेदनांनी रडत राहिलो, त्या कुंभाराला शिव्याशाप देत राहिलो—

"पुढे त्याने मला चाकावर चढविलं, तेव्हा तर अगदी भोवळच आली! त्यानंतर त्याने मला दोरीने कापलं, लाकडी थापटण्याने खूप ठोकलं आणि एवढं करून उन्हात वाळत टाकलं—

"मला आव्यात टाकून जेव्हा माझ्याभोवती प्रचंड जाळ पेटविला गेला, तेव्हा तो कुंभार म्हणजे साक्षात यमराज वाटला अगदी! पण माझ्या यातनांना अजून तरी अन्त कुठे होता?

"आव्यातून भाजून निघाल्यावरही माझे हाल काही संपले नाहीत. बाजारात जो तो येई व मला ठोकून पाही. ही सर्व गिऱ्हाइके मला कुंभारा-इतकीच क्रूर वाटत—

"पण आज ह्या थोर महात्म्यांची सेवा करण्याचं भाग्य मिळाल्यावर मी उमजून चुकलो आहे की मला आकार देणारा कुंभार एक महापुरुष होता. त्याच्या कृपेमुळेच हे अपूर्व भाग्य मला लाभलं आहे."

याच प्रकारे, जीवनात आजार असोत, रोग असोत, अपमान होवो, संपत्तीची हानी होवो, स्वजनांचा वियोग असो की मृत्यू असो—सर्व अवस्थांत ईश्वराच्या अनंत कृपेचा वर्षाव होत आहे. प्रत्येक क्षणाला ही ईश्वरी कृपा अजस्र धारांनी प्रवाहित होत आहे. डोळ्यांना भासणाऱ्या सूर्य–किरणांइतकी ती स्पष्ट आहे. तुम्ही ही कृपा ओळखण्याचा अजून प्रयत्नच केलेला नाही!

卐 卐 卐

# ३५ ॐ ॐ ॐ ॐ "कब्र सच्ची लेकिन मुर्दा झूटा"

जगातील कोणतीही व्यक्ती अगर वस्तू आपल्याला स्वतःहून दुःख देऊ शकत नाही. त्या व्यक्तीशी अगर वस्तूशी असलेल्या आपल्या संबंधातून दुःख निर्माण होत असते. सं-बंध म्हणजेच बंधन. बंधन निव्वळ या वस्तूवरील प्रेमातून उत्पन्न होते असे नव्हे, तर तत्संबंधी द्वेषातून, क्रोधातून किंवा लोभातूनही ते निर्माण होत असते.

हे बंधन इतके सूक्ष्म असते की त्याची गती व स्वरूप थोरा–मोठ्यांच्या ध्यानात चटकन येत नाही. भारतवर्षात अलीकडे होऊन गेलेले अलौकिक ज्ञानी महात्मे श्री**उडिया बाबाजी महाराज** यांनी एके प्रसंगी मला कथा सांगितली होती—

एकदा एक संन्यासी महाराज एका गावातून चालले होते. त्या गावात मुक्काम करण्याचा विचार त्यांच्या मनात आला. आपले शरीर म्हणजे एखादी जिवंत वस्तू आहे, असे ते मानीत नव्हते. [मृत शरीर जेथे पुरले जाते त्या जागेला कबर म्हणतात.] तेव्हा ते साधूमहाराज कुठे राहायला जागा आहे

का असे विचारण्याऐवजी "कहाँ कब्र है क्या कब्र?" असा पुकारा करीत गावात हिंडत होते. त्या साधूंना काय हवे आहे, हे गावात कुणालाच कळेना!

त्या गावातील एका ज्ञानी सज्जनांना मात्र त्या साधुमहाराजांच्या शब्दामागील आशय कळला. ते पुढे होऊन साधूंना म्हणाले, "हां महाराज, कब्र तैयार है लेकिन मुर्दा (प्रेत) कहाँ है?"

"यह है मुर्दा", असे म्हणून साधूमहाराजांनी स्वतःकडे बोट दाखविले. त्या सज्जन पुरुषाने साधूंना हात धरून आपल्या घरी आणले व एका स्वतंत्र खोलीत त्यांची व्यवस्था करून दिली.

एक-दोन नव्हे, तब्बल बारा वर्षे साधूमहाराज त्या खोलीत राहात होते. त्यांना खोलीत अन्न पाठविले जाई. त्या सज्जन गृहस्थाने त्यांची उत्तम सोय करून दिली होती.

एके दिवशी मध्यरात्री साधूमहाराज काही आवाजाने जागे झाले. त्यांनी आपल्या खोलीतून हलकेच पाहिले तो काही चोर त्या गृहस्थाच्या घरातून चोरी करून पळून जाण्याच्या बेतात होते. घरातील इतर सर्वजण निजलेले असताना त्यांनी दाग-दागिने, भांडी-कुंडी गोळा केली होती—त्या सज्जन उदार पुरुषावर हा मोठा आघात होता!

ह्या चोरांना पाहून साधूमहाराजांच्या मनात विचार आला, "किती झालं तरी बारा वर्षं आपण ह्या घरात राहात आहोत. तेव्हा ह्या भल्या गृहस्थाला अशा संकटात साहाय्य करणं आपलं कर्तव्यच आहे"—आणि ताबडतोब ते चोरांच्या मागून त्यांना न कळत जाऊ लागले. साधूमहाराजांच्या अंगावर त्या वेळी लंगोटीशिवाय कुठलेही वस्त्र नव्हते. तेव्हा आपल्या लंगोटीच्या चिंध्या फाडून त्यांनी जाता-जाता खुणेसाठी झाडावर अडकविल्या!

चोरांनी गावाबाहेर आल्यावर मिळालेली लूट एका पडक्या विहिरीत तात्पुरती टाकली व ते जंगलात दिसेनासे झाले.

साधूमहाराजांनी ती विहीर वगैरे नीट पाहून ठेवली व ते खोलीवर परत आले. घरात चोरी झाल्याचे कळल्यावर मोठा हलकल्लोळ माजला. परंतु साधूंनी त्या सज्जन गृहस्थाला बोलावून रात्री घडलेले सर्व सांगितले व त्याच्या माहिती-प्रमाणे शिपायांनी जाऊन विहीरीत टाकलेले धन ताब्यात घेतले.

सर्व शांत झाल्यावर ते सज्जन गृहस्थ नम्रतापूर्वक साधूमहाराजांच्या खोलीत आले. 'हे बहुतेक आपल्याला धन्यवाद द्यायला आले असावेत' असा साधूंनी तर्क केला.

"महाराज, एक प्रश्न विचारायचा होता." ते गृहस्थ म्हणाले.

"विचारा ना."

"कब्र सच्ची कि मुर्दा सच्चा, महाराज?"—

त्या सज्जन गृहस्थाने प्रश्न केला.

अगोदर त्या साधूमहाराजांच्या ध्यानात काही येईना. पण नंतर लख्खन प्रकाश पडला.

आपण स्वतःच्या शरीराला मुडदा समजत होतो खरे, पण प्रत्युपकाराच्या भावनेने का होईना, आपण ती कल्पना सोडून दिली आणि या स्नेहबंधनात सापडलो ह्या वस्तुस्थितीने ते बेचैन झाले आणि हळूच म्हणाले,

**"कब्र तो सच्ची थी लेकिन मुर्दा झूटा था."**

—आणि लगेच साधूमहाराजांनी तो गाव सोडला.

卐 卐 卐

स मा प्त


म. सां. सं. ..., ... शाखा.

दा. क्र. ११६२ दिनांक ....

विषय किशोर क्र. ६४..

BVBK-0401162